




# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २२२ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शनिवार १२ /०९/२०२६ । पाने - ८







# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भेसळखोरांना दणका

## पुण्यात चार ट्रक पनीर-खवा जप्त; नाशिकमध्ये ६.४५ टन खाद्यसाठा जप्त

युवावार्ता (पुणे/नाशिक) प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मिठाई, दुग्धजन्य पदार्थ आणि विविध खाद्यपदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत असताना अन्न व औषध प्रशासनाने (ऋऊ-) भेसळखोरांविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे. पुणे आणि नाशिक जिल्ह्यात करण्यात आलेल्या कारवाईत मोठ्या प्रमाणात संशयित व अनधिकृत खाद्यसाठा जप्त करण्यात आला आहे.



पुण्यातील बुधवार पेठ परिसरात अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने धडक कारवाई करत चार ट्रक पनीर आणि खव्याचा साठा जप्त केला. मोठ्या प्रमाणात साठा आढळल्याने कारवाईसाठी प्रशासनाचा मोठा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला होता. जप्त केलेल्या खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून, त्यांची गुणवत्ता तसेच हा साठा कुठून आणण्यात आला याबाबत तपास सुरू आहे.

गणेशोत्सवात मिठाई, पनीर, खवा आणि इतर दुग्धजन्य पदार्थांची मागणी वाढते. याच पार्श्वभूमीवर खाद्यपदार्थांमध्ये भेसळ होऊ नये तसेच नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कारवाई व्हावी, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. पुण्यातील कारवाईमुळे खाद्य व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातही अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली. कोकणगाव येथील आर्या कोल्ड स्टोरेज अँड एक्सपोर्ट या ठिकाणी छापा टाकून तपासणी करण्यात आली. अन्नपदार्थ मिसळयुक्त तसेच कमी दर्जाचे असल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत फ्रोजन कस्टर्ड पल पल्प, मँगो पल्प आणि क्रीमर असा एकूण ६ हजार ४५७ किलो खाद्यसाठा जप्त करण्यात आला. या जप्त साठ्याची किंमत तब्बल ३९ लाख १८ हजार ५२० रुपये असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाकडून देण्यात आली.

विशेष म्हणजे, संबंधित खाद्यपदार्थांच्या लेबलवर आवश्यक माहिती तसेच ऋडड-ख परवाना क्रमांक आढळून आला नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे जप्त केलेल्या पदार्थांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांविरोधात नियमानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात नागरिक मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची खरेदी करतात. त्यामुळे खाद्यपदार्थांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि नियमांचे पालन याबाबत प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात असून, येत्या काळातही अशा प्रकारच्या कारवाया सुरू राहण्याची शक्यता आहे.

# १९८० च्या ट्रेंडमध्येही आम्ही 'ओरिजनलच'

## जुन्या फोटोने थोरातांनी केल्या आठवणी ताज्या



युवावार्ता (प्रतिनिधी) - सध्या सोशल मीडियावर १९८० च्या दशकातील फोटोंच्या ट्रेंडचा धमाल पाहायला मिळत आहे. यामध्ये काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आपला १९८० मधील फोटो सोशल मीडियावर पोस्ट करून आम्ही १९८० चे ओरिजनल म्हटले आहे .या फोटोला तरुणांची मोठी पसंती मिळाली असून सोशल मीडियावर अनेकांच्या मोबाईलवर या छबी झळकत आहेत. सध्या देशात आणि जगभरात सोशल मीडियाचा जमाना आहे. झेन झी ने संपूर्ण वातावरण बदलून टाकले असून मागील दोन-तीन दिवसापासून सोशल मीडियावर १९८० दशकातील फोटोंचा ट्रेंड सुरू झाला आहे. यामध्ये अनेकांनी आपले फोटो जुन्या स्टाईल मध्ये बनवले आहेत. राज्याचे माजी महसूल व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात हे तरुणांमध्ये आणि राज्यभरातील शेतकऱ्यांमध्ये मोठे लोकप्रिय आहेत. सोशल मीडियावर त्यांचे लाखो फॉलोर्स आहेत. टेक्नोसेव्हि असलेल्या असलेल्या माजी कृषिमंत्री थोरात यांनी आपले १९८० मधील दाढीवर असलेले फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. याचबरोबर आम्ही १९८० चे ओरिजनल असे सांगत त्यांनी तरुणाईला साद घातली आहे. या फोटोला राज्यभरातून मोठी पसंती मिळाली आहे.

सध्या तरुणांमध्ये दाढीची मोठी क्रेझ आहे. बाळासाहेब थोरात यांची १९८० मध्ये दाढीवरील फोटो हे अत्यंत लोकप्रिय होते ते पुन्हा नव्याने सर्वांना पाहायला मिळाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. १९८५ मध्ये संगमनेर विधानसभेचे सर्वात तरुण आमदार म्हणून त्यांनी प्रतिनिधित्व केले याचबरोबर सलग आठ वेळा मोठ्या विक्रमी मताधिक्याने ते विजयी झाले. याचबरोबर राज्यात प्रांताध्यक्ष, महसूल, कृषी, शालेय शिक्षण, रोजगार हमी, पाटबंधारे असे महत्त्वाचे खाते त्यांनी अत्यंत सक्षमपणे सांभाळले. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची युवकांमध्ये मोठी क्रेज आहे. त्यांचे १९८० मधील दाढीचे फोटो हे तालुक्यातील राज्यातील व जिल्ह्यातील युवकांच्या मोबाईलमध्ये व्हाट्सअप फेसबुक इंस्टाग्राम ट्विटर या सर्व सोशल मीडियाच्या माध्यमातून या फोटोंची धूम सर्वत्र पाहायला मिळत आहे.

# टंचाईच्या पार्श्वभूमीवर आवर्तनाचा निर्णय लवकरच होईल - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर- यंदा संगमनेर तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पिकांची पाण्याची गरज लक्षात घेता तातडीने आवर्तन सोडण्यात यावे अशी मागणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली असून याबाबत येत्या दोन-तीन दिवसांत निर्णय होण्याची शक्यता आहे अशी माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

पाण्याच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील विविध गावांमधील शेतकऱ्यांनी आ. खताळ यांची भेट घेऊन आवर्तन सोडण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. यावेळी शेतकऱ्यांनी शेतीतील पिकांना पाण्याची गरज असून पावसाने ओढ दिल्याने उपलब्ध पाण्यावरच मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत असल्याचे आमदारांच्या निदर्शनास आणून दिले.

आ. खताळ म्हणाले की, पावसाने ओढ दिल्यामुळे तालुक्यात शेतीच्या पाण्याची मोठी अडचण निर्माण झाली आहे याची पूर्ण जाणीव आहे. टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तालुक्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन आवर्तन सोडण्यात यावे अशी मागणी आपण केली आहे. यंदा धरणे भरल्याचे समाधान असले तरी धरणाच्या लाभक्षेत्रात अपेक्षित प्रमाणात पाऊस झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून काही गावांच्या पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी आवर्तन देण्यात यावे, अशी भूमिका जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करताना मांडली आहे.


स्व. तुळशीनाथ (आण्णा) प्रभाकरराव भोर श्रध्दांजली विशेषांक पान नं. ३, ४, ५, ६ पानावर

















## संपादकीय...

# निसर्गाचा लहरीपणा आणि बळीराजाची अग्निपरीक्षा !

पावसाने काही दिवसांपासून घेतलेली उघडीप शेतकऱ्यांसाठी दिलासादायक वाटत असली, तरी संकट अद्याप संपलेले नाही. आभाळ काही काळ मोकळे झाले म्हणून शेतकऱ्यांच्या मनावरील काळजीचे ढग दूर झालेले नाहीत. यंदाच्या पावसाळ्यात निसर्गाने पुन्हा एकदा आपले बदलते आणि लहरी रूप दाखविले आहे. कधी मुसळधार पाऊस, कधी संततधार, तर कधी अचानक उघडीप अशा वातावरणामुळे शेतीचे गणित पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या सगळ्याचा सर्वाधिक फटका बसतो आहे तो आधीच आर्थिक अडचणींमध्ये असलेल्या बळीराजाला. शेतकऱ्याने मोठ्या आशेने पेरणी केली. बियाणे, खते, औषधे, मजुरी, मशागत यासाठी मोठा खर्च केला. कर्ज काढून किंवा उधारीवर शेतीची कामे पूर्ण केली. पिके उभी राहू लागली आणि उत्पन्नाचे स्वप्न दिसू लागले. मात्र, निसर्गाच्या अनिश्चिततेने त्या स्वप्नावरच पाणी फेरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही भागात अतिवृष्टीमुळे शेतात पाणी साचले, तर काही ठिकाणी पिकांची मुळे कुजण्याची भीती निर्माण झाली. फळबागा, भाजीपाला आणि खरीप पिकांनाही हवामानातील बदलाचा फटका बसत आहे. पावसाची उघडीप ही त्यामुळे केवळ हवामानातील बदल नाही; ती शेतकऱ्यांसाठी सावरण्याची संधी आहे. शेतातील साचलेले पाणी बाहेर काढणे, पिकांची पाहणी करणे, रोगराईचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी फवारणी करणे, नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करणे आणि पुढील नियोजन करणे, अशी अनेक कामे या काळात करावी लागणार आहेत. मात्र, त्यासाठी शेतकऱ्याला आर्थिक आणि तांत्रिक मदतीची गरज आहे. संकटाच्या काळात प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. पावसामुळे नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे वेळेत होणे, प्रत्यक्ष नुकसानीची अचूक नोंद होणे आणि पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळणे आवश्यक आहे. अनेकदा पंचनाम्याची प्रक्रिया कागदोपत्री वेगाने सुरू झाल्याचे दिसते; परंतु प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यापर्यंत पोहोचेपर्यंत बराच काळ निघून जातो. ही दरी कमी करण्याची गरज आहे. शेतकऱ्याला केवळ नुकसानभरपाई देऊन प्रश्न सुटणार नाही. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतीचे नियोजन नव्याने करावे लागणार आहे. हवामानाचा अंदाज गावपातळीवर पोहोचविणे, पिकनिहाय मार्गदर्शन करणे, जलनिस्सारणाची व्यवस्था सुधारणे, सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन देणे आणि हवामानाच्या जोखमीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण करणाऱ्या पीकविमा योजनेची अंमलबजावणी प्रभावी करणे, ही काळाची गरज आहे. आज शेतकरी केवळ पावसाशी झुंजत नाही. त्याच्यासमोर वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता, बाजारभावातील अनिश्चितता, कीड-रोगांचा वाढता धोका आणि कर्जाचा बोजा अशी अनेक संकटे आहेत. त्यात निसर्गाचा लहरीपणा आणखी एक मोठे आव्हान बनला आहे. त्यामुळे शेतकऱ्याला 'अन्नदाता' म्हणून गौरविण्यापेक्षा त्याच्या अडचणी समजून घेऊन ठोस धोरणे आखणे अधिक महत्त्वाचे आहे. पावसाची उघडीप शेतकऱ्यांसाठी संधी घेऊन आली आहे. मात्र, ही संधी संकटातून बाहेर पडण्यासाठी पुरेशी ठरेल का, हे प्रशासनाच्या तत्परतेवर आणि हवामानाच्या पुढील वाटचालीवर अवलंबून आहे. शेतकऱ्याने पिकासाठी घाम गाळला आहे; आता त्याच्या पाठीशी उभे राहण्याची जबाबदारी समाजाची आणि शासनाची आहे. निसर्गावर नियंत्रण ठेवणे माणसाच्या हातात नाही; पण निसर्गाच्या लहरीपणामुळे होणारे नुकसान कमी करणे निश्चितच आपल्या हातात आहे. त्यासाठी दीर्घकालीन नियोजन, सक्षम प्रशासन आणि शेतकऱ्याला केंद्रस्थानी ठेवणारे कृषी धोरण आवश्यक आहे. आज आभाळाने उघडीप घेतली आहे. शेतकऱ्याच्या मनालाही अशीच उघडीप मिळावी, हीच अपेक्षा. त्याच्या शेतात पुन्हा हिरवाई नांदावी, कष्टाला योग्य मोबदला मिळावा आणि निसर्गाच्या प्रत्येक परीक्षेत तो अधिक सक्षम होऊन उभा राहावा-हीच खरी बळीराजाच्या सन्मानाची दिशा आहे. शेती ही केवळ अर्थव्यवस्थेचा एक घटक नाही, तर ग्रामीण जीवनाचा आधार आहे. त्यामुळे पावसाच्या प्रत्येक लहरीपणाचा परिणाम केवळ शेताच्या बांधापर्यंत मर्यादित राहत नाही; त्याचे पडसाद बाजारपेठेपासून सर्वसामान्यांच्या घरापर्यंत उमटतात. पीक वाचले तर शेतकऱ्याच्या हातात पैसा येतो, बाजारपेठेला चालना मिळते आणि ग्रामीण अर्थचक्र गतिमान होते. म्हणूनच शेतकऱ्याच्या नुकसानीकडे केवळ 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून पाहून चालणार नाही. त्याकडे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील आघात म्हणून पाहण्याची आणि त्यानुसार उपाययोजना करण्याची गरज आहे. आज बळीराजाला सहानुभूतीच्या शब्दांपेक्षा ठोस आधाराची गरज आहे. पाऊस कधी येईल आणि कधी उघडीप देईल, हे निसर्ग ठरवेल; पण संकटाच्या वेळी शेतकऱ्याच्या पाठीशी किती भक्कमपणे उभे राहायचे, हे शासन आणि समाज ठरवू शकतात. निसर्गाची परीक्षा सुरूच राहणार आहे; मात्र या परीक्षेत बळीराजा एकटा पडू नये, हीच खरी जबाबदारी आहे.

# शेतकऱ्यांना आर्थिक मदत व नुकसान भरपाई देण्याची ग्राहक पंचायतीची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यात यंदाच्या पावसाळ्यात अनेक भागांत अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप पिके संकटात सापडली आहेत. भात, सोयाबीन, बाजरी, भुईमूग, मका तसेच विविध कडधान्यांची पिके पाण्याअभावी सुकून, करपून व जळून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पावसाअभावी नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबतचे निवेदन निवासी नायब तहसीलदार किसन लोहरे यांना देण्यात आले. ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, माधवराव तिटमे व सचिव राम रुद्रे यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी प्रशासनासमोर मांडल्या.

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील शेतकरी गेल्या दीड महिन्यापासून पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. दररोज आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी मात्र निराशाच पडत आहे. पावसाने दडी मारल्याने अनेक ठिकाणी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतातील उभी पिके सुकू लागली आहेत. पिकांची पाहणी केल्यास नुकसानीची गंभीरता स्पष्ट होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अकोले तालुक्यातील काही आदिवासी भागांत सुरुवातीच्या काळात अतिवृष्टी झाली होती. मात्र, त्यानंतर पावसाने मोठी उघडीप दिल्याने या भागातील भातासह इतर पिकांवरही पाण्याअभावी संकट ओढवले आहे. त्यामुळे शेतकरी, पशुधन आणि सर्वसामान्य ग्रामीण नागरिकांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

अकोले तालुक्यातील ई-पिक पाहणी केवळ कागदोपत्री न करता संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतावर जाऊन करावी. पावसाअभावी वाया गेलेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शासनाने नुकसानभरपाई जाहीर करावी. तसेच संकटग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी ग्राहक पंचायतीने केली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, जिल्हाधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# सामुदायिक श्रावण समारोप सोहळ्याचे आयोजन

## रामचरित्र मानस व नवनाथ पारायणाने कपारेश्वर, खांडगाव परिसर होणार भक्तिमय

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील श्री क्षेत्र खांडगाव येथील इच्छापूर्ती कपारेश्वर शिव मंदिर ट्रस्टच्या वतीने रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी सामुदायिक भव्य श्रावण समारोपी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत प.पू. गुरुवर्य स्वामी रामानंदगिरी महाराज (सितारामजी महाराज) यांच्या कृपाशीर्वादाने होणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने रामचरित्र मानस व नवनाथ पारायण, महाआरती, रामायण ग्रंथ आरती, भव्य रामायण मिरवणूक, जाहीर कीर्तन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महंत सद्गुरु श्री रामगिरीजी महाराज यांचे जाहीर कीर्तन हे या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.



कार्यक्रमाची सुरुवात पहाटे ५ ते ६ या वेळेत महाआरतीने होणार असून, सकाळी ६ ते ७ या वेळेत रामायण ग्रंथ आरती होईल. सकाळी १० ते ११.३० या वेळेत भव्य रामायण मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी ११.३० ते दुपारी १.३० या वेळेत महंत सद्गुरु श्री रामगिरीजी महाराज यांचे जाहीर कीर्तन होणार आहे. दुपारी १.३० ते सायंकाळी ५ या वेळेत भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा भक्तिमय सोहळा डोंगरवाडी शिवगुहा मंदिर, श्री क्षेत्र खांडगाव, ता. संगमनेर येथे होणार आहे. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमांचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन इच्छापूर्ती कपारेश्वर शिव मंदिर ट्रस्ट व समस्त शिवभक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचे नियोजन ट्रस्टचे मार्गदर्शक ड. मधुकरराव गुंजाळ व अध्यक्ष स्व. प्रभाकर गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ट्रस्टचे अध्यक्ष प्रविण गुंजाळ, उपाध्यक्ष सोमनाथ गुंजाळ, खजिनदार रावसाहेब गुंजाळ, सचिव रामभाऊ गुंजाळ, विश्वस्त रघुनाथ गुंजाळ, गोपीनाथ बालोडे, पुजारी पांडुरंग गुंजाळ तसेच नामदेव गुंजाळ, आप्पासाहेब गुंजाळ, सुनील बालोडे, तानाजी गुंजाळ, मेहेर गुंजाळ, दत्तू गुंजाळ आदी परिश्रम घेत आहेत.


**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Shaikh Wajid Rashid
NEW NAME AS
Vajid Rashid Shaikh
Address:- Near PWD Office Naikwadpura Sangamner 422605 Dist - Ahilyanagar

**Yuvavarta.in**
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

**पाहिजेत**
अमृता चहासाठी
सेल्समन प्रमोटर (२ जागा, महिला)
पगार - १०००० (बेसिक + इंसेन्टीव्ह)
संपर्क- एस. आर. सेल्समन कार्पोरेशन (मार्केट यार्ड, संगमनेर)
7030501936
9904839193

**पाहिजेत**
ऑफिस बॉय (प्युन)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
स्वत:चे वाहन आवश्यक
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Khan Raziya Khatoon Mohd Shamim
NEW NAME AS
Raziya Mohammad irfan Chaudhari
Address:- Matade Mala Sukewadi Road Sangamner 422605

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
Mariyam Irfanahmed Chawdhary
NEW NAME AS
Mariyam Irfanahamed Chwdhary
Address:- Matade Mala Sukewadi Road Sangamner 422605

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मळी, संगमनेर
- संपर्क -
9921245753

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

**SR THORAT** — **JOB** — **GAGANGIRI** PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com






# जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

**पाहिजेत**
रिषभ गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**फ्लॅट विकणे आहे**
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड, पर्पल ब्लुम सोसायटी, साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर, 1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी किचन ट्रॉली, बेड, सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

**आकर्षक पगारावर जागा भरणे आहे**
सुपरवायझर
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)
ऑफिस असिस्टंट
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**FinanCity** STOP THINKING, START INVESTING
उत्कृष्ट करिअर संधी तुमच्यासाठी !
उत्तम संधी, उत्तम करिअर आणि उज्वल भविष्य तुमच्या प्रतीक्षेत आहे
१२ सप्टेंबरपर्यंत मुलाखत सुरू आहे
बँक ऑफिस - २५ जागा (महिला)
डेटा एन्ट्री व डॉक्युमेंटेशन रिपोर्ट तयार करणे, ऑफिस सपोर्टची कामे
पात्रता - कोणत्याही शाखेतील पदवीधर
अ‍ॅडमिन / एचआर - २ जागा (महिला)
प्रशासकीय कामे, कर्मचारी समन्वय, एचआर संबंधित कागदपत्रे
पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर
फिल्ड वर्क सेल्स मॅनेजर- ५ जागा (पुरुष)
फिल्ड भेटी व ग्राहक संपर्क, नवीन ग्राहक जोडणे, सेल्स टार्गेट पूर्ण करणे
पात्रता- कोणत्याही शाखेतील पदवीधर
FINANCITY सोबत करिअर का घडवावे?
आकर्षक पगार व कमिशन,करिअर मध्ये वाढीच्या संधी, मैत्रीपूर्ण कामाचे वातावरण, स्थैर्य आणि सुरक्षित भविष्य, परफॉर्मन्सवर आधारित प्रोत्साहन
अधिक माहितीसाठी संपर्क करा
7208095977 / 9623532907
फायनान्स सिटी, नेअर ग्रेव्ही यार्ड हॉटेल, अकोले बायपास रोड, संगमनेर

**पाहिजेत**
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**नोकरीची सुवर्णसंधी**
श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५१

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

# तुळशीराम प्रभाकर भोर (अण्णा) यांना भावपूर्ण श्रध्दांजली !

## संगमनेरच्या शिक्षण व सहकार क्षेत्रातील शांत, सात्त्विक व्यक्तिमत्त्व हरपले





**– मा. बाळासाहेब थोरात**
**माजी मंत्री तथा चेअरमन, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, अमृतनगर**



कै. तुळशीनाथ प्रभाकरराव भोर यांचे निधन ही संगमनेर तालुक्यातील शिक्षण, सहकार आणि कृषी क्षेत्रासाठी मोठी हानी आहे. शांत, संयमी, सात्त्विक आणि कृतिशील व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. कोणताही गाजावाजा न करता संस्थांच्या विकासासाठी सातत्याने काम करणे, दिलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडणे आणि आपल्या परिसराच्या प्रगतीसाठी योगदान देणे, हा त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता.

तुळशीनाथ भोर हे कृषी क्षेत्रातील पदवीधर होते. वडील कै. प्रभाकरराव भोर यांच्याकडून त्यांना सामाजिक बांधिलकी, सहकाराची दृष्टी आणि समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळाली. प्रभाकरराव भोर हे स्वातंत्र्यपूर्व चळवळीतील प्रभावी वक्ते, कर्तृत्ववान कार्यकर्ते आणि सहकार क्षेत्रातील प्रभावी नेतृत्व होते. सहकारमहर्षी तीर्थरूप भाऊसाहेब थोरात आणि प्रभाकरराव भोर यांचा स्नेह परिचय स्वातंत्र्य चळवळीच्या काळात झाला. पुढे ही मैत्री अधिक दृढ होत गेली. भाऊसाहेब थोरात यांचे खंदे समर्थक आणि जिवलग मित्र म्हणून प्रभाकररावांनी संगमनेर तालुक्याच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. प्रभाकरराव भोर यांनी महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशनचे उपाध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळली. मिळालेल्या पदाचा आणि संधीचा उपयोग त्यांनी स्वतःपुरता मर्यादित न ठेवता संगमनेर तालुक्यातील सहकारी संस्थांच्या विकासासाठी केला. त्यांच्या या कर्तृत्वाचा आणि विचारांचा वारसा तुळशीनाथ भोर यांनी पुढे नेला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तुळशीनाथ यांनी तालुक्यातील विविध संस्थांमध्ये जबाबदारी स्वीकारली. आंबी-माळेगाव सोसायटीचे संचालक आणि चेअरमन म्हणून त्यांनी उल्लेखनीय काम केले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर वडिलांच्या सल्ल्यानुसार त्यांनी माळेगाव-आंबी खालसा परिसरात कृषी क्षेत्रात स्वतः विविध प्रयोग केले. आधुनिक पद्धतीने उत्कृष्ट शेती करण्याबरोबरच इतर शेतकऱ्यांनाही मार्गदर्शन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. प्रभाकरराव भोर आणि भाऊसाहेब थोरात यांच्या जिव्हाळ्याच्या मैत्रीतून आमची बहीण मंदाताई यांचा विवाह तुळशीनाथ यांच्याशी झाला. त्यामुळे राजकीय आणि सामाजिक ऋणानुबंधांना कौटुंबिक नात्याचीही जोड मिळाली. मात्र, या नात्याचा कधीही मोठेपणा न सांगता तुळशीनाथ यांनी स्वतःच्या कर्तृत्वावर आपली वेगळी ओळख निर्माण केली. घारगाव, आंबी, माळेगाव परिसरातील शैक्षणिक आणि सहकारी संस्थांच्या विकासासाठी त्यांनी जोमाने काम केले.

संगमनेर सहकारी सूतगिरणीचे चेअरमन, तसेच तब्बल ३१ वर्षे संगमनेर सहकारी शेती संघाचे संचालक म्हणून त्यांनी काम केले. याशिवाय २० वर्षे सह्याद्री बहुजन विद्याप्रसारक संस्थेचे सहसेक्रेटरी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. संस्थांच्या विकासात त्यांचे योगदान मोलाचे राहिले. १९९० साली प्रभाकरराव भोर यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सह्याद्री बहुजन शिक्षण संस्थेने आंबी खालसा येथे प्रभाकरराव भोर माध्यमिक विद्यालय सुरू केले. या विद्यालयाच्या उभारणीसाठी तुळशीनाथ भोर यांनी मोठे परिश्रम घेतले. परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली सुविधा मिळावी, या भावनेतून विद्यालयाला आवश्यक ते सहकार्य मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे वडिलांच्या कार्याचा वारसा केवळ नावापुरता नव्हे, तर प्रत्यक्ष संस्थात्मक कार्यातून त्यांनी पुढे नेला.

तुळशीनाथ यांचा परिवार मोठा आणि ऋणानुबंध जपणारा होता. लीलाताई, सुवर्णाताई, रंजनाताई, संजीवनी व शैला या बहिणी, राजेंद्र व महेंद्र हे बंधू तसेच वैभव, विक्रम आणि वैशाली ही मुले असा त्यांचा परिवार आहे. बहिणी, बंधू, मुले आणि थोरात परिवारासह असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यांचा त्यांना मनापासून अभिमान होता. माझ्यासाठी तुळशीनाथ हे केवळ मेव्हणे नव्हते, तर जिवलग मित्र आणि विश्वासू सहकारी होते. एखाद्या कामाची अपेक्षा व्यक्त केली की त्याबाबत फार चर्चा न करता ते ते काम पूर्ण करूनच हास्य मुद्रेने भेटत असत. त्यांच्या या शांत स्वभावातून त्यांची कर्तव्यनिष्ठा आणि माणुसकी दिसून येत असे. त्यांच्या सहकार्याची पद्धत बोलण्यापेक्षा कृतीवर विश्वास ठेवणारी होती.

आज त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. त्यांच्या बंधूंना आणि मुलांना यानिमित्ताने एकच सांगावेसे वाटते की, कै. प्रभाकरराव भोर आणि कै. तुळशीनाथ भोर यांनी उभा केलेला शिक्षण, सहकार आणि सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यांच्या कार्यातून उभ्या राहिलेल्या संस्था आणि त्यांनी घडविलेली माणसे हीच त्यांच्या स्मृतींची खरी ओळख ठरेल. कै. तुळशीनाथ भोर यांच्या जाण्याने आम्हा सर्वांना अतिशय दुःख झाले आहे. भोर परिवारावर आलेल्या या दुःखात आम्ही थोरात, तांबे परिवार तसेच सर्व आप्तेष्ट मनःपूर्वक सहभागी आहोत. तुळशीनाथ यांच्या शांत, सात्त्विक आणि सेवाभावी व्यक्तिमत्त्वाला विनम्र अभिवादन करून त्यांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

## सहकारी संस्था उर्जावस्थेत ठेवण्यात आण्णांचा मोठा वाटा

**डॉ. सुधीर भास्करराव तांबे**
**माजी आमदार**
**नाशिक पदवीधर मतदारसंघ**

आमचे साडू व संगमनेरच्या सहकार क्षेत्रातील नावाजलेले व्यक्तिमत्व तुळशिनाथ भोर यांचे ३ सप्टेंबरला अचानक निधन झाले आणि भोर परिवारासह सर्व नातेवाईक, सहकार क्षेत्र आणि परिसराला दुःखद धक्का बसला. तुळशीनाथ भोर हे संगमनेर तालुक्यातील ज्येष्ठ नेते प्रभाकर साहेब यांचे ज्येष्ठ चिरंजीव आणि भोर परिवारातील कुटुंबप्रमुख होते. तुळशीनाथ भोर यांचे १९७७ साली जोर्वे येथे लग्न झाले आणि ते थोरात यांचे जावई आणि आमचे साडू झाले. त्यांचा स्वभाव अतिशय शांत, प्रेमळ असल्याने ते सर्वांना हवेसे वाटायचे, विशेषता: माळेगाव, घारगाव परिसरात अण्णा म्हणून ते प्रसिद्ध होते. १९९० साली प्रभाकरराव भोर साहेब यांचे निधन झाले आणि त्यानंतर तुळशीनाथ यांनी त्यांचे कार्य हाती घेतले. आंबी- माळेगाव सोसायटी, प्रभाकरराव भोर विद्यालय, ग्रामपंचायत आणि संलग्न संस्था ऊर्जेतावस्थेत आणण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. ते कृषी पदवीधर होते आणि उत्कृष्ट शेती करण्यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केला. आपल्या वडिलांचा सामाजिक सेवेचा वारसा वृद्धिंगत करण्यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केले.

संगमनेर तालुक्याच्या शिखर संस्थांमध्ये संगमनेर सहकारी शेतकी संघ, सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्था, संगमनेर तालुका सूतगिरणी, अमृतवाहिनी शिक्षण संस्था यासारख्या अनेक संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून त्यांनी काम केले. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राजकीय दृष्ट्या सतत प्रयत्न केले. तालुक्याचे नेतृत्व माजी मंत्री बाळासाहेब थोरात साहेब यांना सहकार्य केले. तुळशीनाथ भोर यांचे बंधू , बहिणी, मुले, मुलगी, आणि सर्व परिसरातील त्याचा चाहता वर्ग त्यांच्या निधनाने दुःखी झालेला आहे. आम्हा सर्व नातेवाईकांनाही दुःख झाले आहे. तुळशीनाथ भोर यांचे कार्य आणि विचार स्मरणात ठेवून त्यांच्या स्मृती जपणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली होईल.



## आमचा आधारवड हरपला; आण्णांच्या आठवणींना भावपूर्ण उजाळा



**सौ. सुवर्णा दिलीप सोमवंशी**
**– बहिण**

कै. तुळशीनाथ (आण्णा) हे आमचे सर्वात थोरले भाऊ. त्यांच्यानंतर मी आणि आम्ही सर्व भावंडे. आम्ही त्यांना नेहमीच आदराने आण्णा म्हणून संबोधायचो. आमचे वडील कै. प्रभाकरराव भोर साहेब यांचे सर्व गुण आण्णांमध्ये होते. घरात लहानपणापासून धार्मिक वातावरण होते. आण्णांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रभावशाली होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ, मनमिळावू आणि शिस्तप्रिय होता.

आण्णा रोज सकाळी लवकर उठायचे. आंघोळ करून देवपूजा करायचे. त्यांना स्वच्छतेची आणि नीटनेटकेपणाची विशेष आवड होती. प्रत्येक वस्तू व्यवस्थित ठेवण्याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. त्यांना वाचनाची खूप आवड होती. आवडलेली पुस्तके विकत घेऊन ते वाचायचे. मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रे, कथा-कादंबऱ्या ते नियमित वाचत असत. घरात सुरुवातीपासून रेडिओ होता. रेडिओवरील बातम्या, भक्तिगीते आणि भावगीते ते आवडीने ऐकत असत. त्यांना खेळाचीही आवड होती. शालेय जीवनात त्यांनी हॉकी खेळली होती. क्रिकेट सामने पाहण्याची त्यांना विशेष आवड होती.

आण्णांचे शिक्षण माळेगाव पठार, प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरानगर आणि पुणे येथील कृषी महाविद्यालयात झाले. त्यांनी बी.एस्सी. (कृषी) ही पदवी प्राप्त केली. नोकरी न करता शेती करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. शेतीमध्ये त्यांनी अनेक नवीन प्रयोग केले. सुधारित वाणांची पिके घेतली. कांदा, भाजीपाला, डाळिंब आदी विविध पिकांचे उत्पादन त्यांनी घेतले. शेतीविषयी मार्गदर्शन घेण्यासाठी अनेक लोक त्यांच्याकडे येत असत. आण्णाही त्यांना मनापासून योग्य सल्ला आणि मार्गदर्शन देत असत. त्यामुळे त्यांचा समाजात चांगला जनसंपर्क निर्माण झाला होता. दि. २४/०९/१९९० रोजी वडील कै. प्रभाकरराव भोरसको यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या आजारपणात आण्णांनी खूप प्रयत्न केले; मात्र नियतीपुढे त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. वडिलांच्या निधनानंतर काही काळ ते निराश झाले, परंतु लगेच स्वतःला सावरून त्यांनी संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली.

पत्नी मंदाताई, भाऊ राजेंद्र, बहिणी आणि संपूर्ण कुटुंबाच्या सहकार्याने त्यांनी संसाराचा गाडा उत्तम प्रकारे चालवला. संगमनेर येथे बंगला घेऊन त्यांनी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. स्वतःची मुले, भावाची मुले, भाचे-भाच्या आणि बहिणींच्या मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. वडिलांच्या पश्चात आजी, मातोश्री तसेच वेणूताई देशमुख यांचा त्यांनी मोठ्या प्रेमाने सांभाळ केला. कुटुंबाची जबाबदारी पार पाडतानाच त्यांनी मा. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राजकारण आणि समाजकारणातही सक्रिय सहभाग घेतला. विविध पदांवर काम करत त्यांनी समाजसेवेचा आदर्श निर्माण केला.

आण्णा आमच्यासाठी केवळ भाऊ नव्हते, तर वडिलांसारखे होते. संगमनेरला आल्यावर ते नेहमी आमच्याकडे आवर्जून यायचे. माझ्या बहिणी लिला (पुणे), रंजना, संजीवनी आणि शैला यांच्याशी त्यांचे प्रेमाचे नाते होते. आमच्याकडे आल्यावर ते सर्वांची चौकशी करायचे. घरातील महत्त्वाच्या निर्णयांमध्ये त्यांचा सल्ला घेतला जायचा. कुटुंबातील कोणत्याही अडचणीच्या वेळी ते नेहमी मदतीला धावून येत असत. मुलामुलींचे शिक्षण, नोकरी, विवाहकार्य यासाठी त्यांनी कायम पुढाकार घेतला. फेब्रुवारी १९७८ मध्ये माझ्यावर एक मोठे संकट आले. त्या वेळी अपघातानंतर मला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. वेळेत उपचार मिळाल्यामुळे माझे प्राण वाचले. तो माझा पुनर्जन्मच होता. त्यानंतर झालेल्या शस्त्रक्रियेच्या वेळीही आण्णा सतत माझ्या सोबत राहिले. डॉक्टरांकडे चौकशी करून ते माझ्या आरोग्याची काळजी घेत असत. आण्णा खऱ्या अर्थाने कुटुंबवत्सल होते. त्यांनी सर्व भावंडे, त्यांची मुले, नातवंडे, भाचे-भाच्या यांच्यावर मनापासून प्रेम केले. चांगले संस्कार दिले.

वडिलांच्या निधनानंतर ३७ वर्षे त्यांनी आम्हाला कधीही वडिलांची कमतरता जाणवू दिली नाही. राखी पौर्णिमेला ते न चुकता आमच्या घरी यायचे. तो दिवस आमच्या सर्वांसाठी आनंदाचा असायचा. दरवर्षी दिवाळीत आम्ही सर्व माहेरी एकत्र जमायचो. सर्वांना कपडे, फराळ आणि भेटवस्तू देऊन ते प्रेमाचा वर्षाव करायचे. त्याचबरोबर योग्य मार्गदर्शन करून जीवनात पुढे जाण्याची प्रेरणा द्यायचे.

आण्णा घरी आले की एक वेगळाच आनंद निर्माण व्हायचा. ते मनाने खूप मोठे होते. माझ्या मुलाच्या अकाली निधनानंतर काही दिवसांनी ते माझ्या घरी आले होते. त्यांनी माझी आणि कुटुंबाची चौकशी केली. ते फार बोलत नसत, पण त्यांच्या अबोल प्रेमातूनही आम्हाला आधार मिळायचा. त्यांच्या येण्याने मला जगण्याची नवी उमेद मिळायची. माझ्यावर त्यांचे प्रेम आणि जिव्हाळा आयुष्यभर राहिला. मी आणि माझे कुटुंबही त्यांच्यावर मनापासून प्रेम आणि आदर करत आलो. या वर्षी राखी पौर्णिमेच्या वेळी आण्णा आजारी होते. प्रकृती ठीक नसल्याने ते राखी बांधण्यासाठी येऊ शकले नाहीत. आयुष्यात प्रथमच असे घडले. हे समजल्यावर आम्ही रविवारी कुटुंबासह त्यांच्याकडे जाऊन राखी बांधली. मात्र तीच माझी आण्णांसोबतची शेवटची भेट ठरली.

गुरुवारी त्यांच्या निधनाची बातमी आली आणि आमचा आधारवड हरपला. आज आण्णा आमच्यात नाहीत, याचे दुःख शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. परमेश्वर चरणी एवढीच प्रार्थना आहे की, असा प्रेमळ, कर्तव्यनिष्ठ आणि आधार देणारा भाऊ जन्मोजन्मी मिळावा आणि त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी.

## आमचे दाजी – कै. अण्णा



**सौ. दुर्गाताई तांबे**
**माजी नगराध्यक्षा**
**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

आम्हा भावंडांचे दाजी तुळशीनाथ भोर यांचे मागच्या आठवड्यात अचानक हृदयविकाराने निधन झाले आम्हा सर्व भावा बहिणींसाठी व नातेवाईकांसाठी ही एक धक्कादायक बातमी होती.

माझे वडील सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांचे सहकारातील सहकारी खंदे समर्थक प्रभाकरराव भोर यांची व दादांची मैत्री सर्वांनाच माहीत होती. माझी बहीण सौ मंदाताई हिच्या लग्नाचा विषय निघाला. तेव्हा दादांना आठवले की भोर साहेबांचा मुलगा तुळशीनाथ आत्ताच बीएससी ॲग्री झाला आहे. चर्चा झाली आणि मंदाताई चे लग्न त्यांच्याशी झाले अन तुळशीनाथ भोर आम्हा भावंडांचे दाजी झाले.

लग्नाला आता पन्नास वर्षे झाली तेव्हा नवरी बरोबर सासरी सोबत पाठीराखा कलवऱ्या जाण्याची पद्धत होती. आम्ही दोन-तीन वस्तीवरच्या बहिणी एक मावशी आणि दोन-तीन मावस बहिणी अशी सहा ते सात कलवऱ्या गेलो. तेव्हा कलवरी जायला खूप आवडायच. आमची एकदम छोटी बहीण अलका ही मागे लागली आम्ही सर्वजणी नवरी बरोबर गेलो आम्ही नदीच्या काठावर राहणाऱ्या पोरी त्या माळेगाव पठारला बैलगाडीत जाताने घाट नसलेल्या डोंगरातून खूप घाबरलो. जेव्हा गावात पोहोचलो तर गाव दिसतच नव्हते. पहिलं मारुतीच्या देवळात बसवले, नंतर वरात झाली.

सकाळी उठलो तर असे दिसले की सर्व बाजूंनी उंच उंच डोंगर व पठारावर सर्वांचे शेती होत्या या काळात कलवऱ्यांचे फार लाड व ठेप नसायची. दाजींची विधवा आत्याबाई होती दाजींची आई फारच शांत स्वभावाची होती. आत्याबाईचाच रुबाब होता. सकाळी उठल्यापासून आम्हाला कपडे धुण्यासाठी दोन-तीन बादल्या भरून कपडे दिले. नंतर पाट्यावर भला मोठा मसाला वाटायला दिला. चहापाणी नाश्ता काहीच विचारले नाही. हळूहळू कलवऱ्यांना रडू फुटले. भोर साहेबांना मी म्हणाले आम्हाला जार्वेला जायचे आहे. ते म्हणाले अजिबात नाही. त्यात अमावस्या. एक बुधवार आला. मुक्काम वाढला. मंदाबाई म्हणायची बाई पोरींनो तुम्ही दोन दिवसात रडता, मला इथे आयुष्यभर रडायचे आहे. भोर साहेबांनी आम्हाला सर्वांना कपडे घेतले. माझे साडीचे वय नसूनही मला माझ्या आयुष्यातील फार सुंदर साडी घेतली. तेव्हापासून मी कलवरी म्हणून जायला कधीच तयार झाले नाही.

असे आमच्या दाजींचा परिवार मोठा आहे. पाच बहिणी, दोन भाऊ राजेंद्र, महेंद्र सर्व छोटेच होते. दाजींची त्या काळात इंग्रजी माध्यमातून बीएसस्सी ॲग्री झाली होती. त्यांचे वर्गमित्र श्री बिपीन दादा कोल्हे, श्री चंद्रकांत देशमुख, श्री रविंद्र देवकर, श्री रावसाहेब म्हस्के इतर मित्र होते. त्यांच्या लग्नानंतर ते शेतीच करत होते. त्यांना विक्रम, वैभव, राणी हे मुले झाले. मंदाताई तर फारच शांत स्वभावाची आहे पण दिसायला खूप सुंदर आहे. बोलणं पण अतिशय शांत. दाजींनी तिला खूप जीव लावला. ती दाजीं बरोबर शेतावरच राहिली. दाजी उत्तम शेती करायचे. त्यांचे टोमॅटोचे पीक बघायला खासदार शंकरराव काळे आले होते. ते शेतात नवनवीन प्रयोग करायचे. वाचन फार होते. फेसबुक इन्स्टावर जगातील अनेक विद्यापीठांचे इंटरनॅशनल प्रोफेसर डॉक्टररेट मित्र जोडले होते. ते विनोदी मिस्कील होते. भाषणात अनेक विनोदी कथाकथन सांगायचे व प्रेक्षकांना हसवायचे. इंग्लिश पेपर, इंग्रजी पुस्तके रिडर्स डायजेस्ट सारखे इंग्रजी मासिक ते वाचायची.

मुलांवर, पुतण्यांवर, मुलींवर फार प्रेम होते. प्रेमळ स्वभावाचे असल्याने त्यांचे संपूर्ण कुटुंब एकत्र राहिले. विक्रम, वैभव, किरण, प्रवीण गंधार सर्व मुले फार चांगले आहे. गंधार तर खरगपूरच्या आयआयटीमध्ये आहे. असे आम्हा भावंडांचे दाजी गेल्याने फार मोठी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून येणारी नाही. दाजींना भावपूर्ण श्रद्धांजली !



# कै. तुळशीनाथ (अण्णा) प्रभाकरराव भोर साहेब यांचा समग्र जीवनपट

संगमनेर तालुक्यातील माळेगाव पठार परिसराच्या सामाजिक, शैक्षणिक, सहकार आणि कृषी क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा अमिट ठसा उमटविणारे कै. तुळशीनाथ (अण्णा) प्रभाकरराव भोर साहेब हे एक संवेदनशील, कर्तव्यनिष्ठ आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते. वडील स्वर्गीय प्रभाकरराव रामचंद्र भोर साहेब यांच्या समाजसेवेचा, सहकाराचा आणि शिक्षण प्रसाराचा वारसा त्यांनी आयुष्यभर जपला.

**बालपण व शिक्षण**

कै. तुळशीनाथ (अण्णा) भोर साहेब यांचा जन्म २५ एप्रिल १९५५ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जीवन शिक्षण मंदिर, माळेगाव पठार, ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथे सन १९६१ ते १९६४ या कालावधीत झाले. त्यानंतर त्यांनी माध्यमिक शिक्षण प्रगती पब्लिक स्कूल (इंग्रजी माध्यम), लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर येथे पूर्ण केले. पुढे सन १९७२ ते १९७६ या कालावधीत त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. शासकीय कृषी महाविद्यालय, पुणे येथून त्यांनी कृषी विषयातील पदवी (बी.एस्सी. ॲग्रीकल्चर) प्राप्त केली.

**कौटुंबिक पार्श्वभूमी**

कै. तुळशीनाथ (अण्णा) भोर साहेब यांचे वडील स्व. प्रभाकरराव रामचंद्र भोर साहेब हे सहकार, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील मोठे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या आई स्व. विमलबाई प्रभाकरराव भोर या कुटुंबाचा मजबूत आधार होत्या. अण्णा भोर साहेब यांच्या कुटुंबात सामाजिक आणि संस्कारमय वातावरण होते. वडिलांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर लहानपणापासूनच पडला. त्यांचे विवाह संगमनेर येथील थोरात परिवारातील कन्या सौ. मंदाकिनी (मंदा) तुळशीनाथ भोर यांच्याशी झाले. या विवाहामुळे सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात (दादा) यांच्या परिवाराशी त्यांचे घनिष्ठ सामाजिक व कौटुंबिक संबंध निर्माण झाले. सौ. मंदाकिनी भोर या स्व. हौसाबाई व कै. दामोधर थोरात यांच्या कन्या होत. त्या महाराष्ट्राचे माजी महसूल, कृषी, जलसंधारण, शिक्षण व पाटबंधारे मंत्री मा. ना. बाळासाहेब थोरात साहेब यांच्या भगिनी तसेच प्रथम नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई सुधीर तांबे यांच्या भगिनी होत.

अण्णा भोर साहेब यांना

१) श्री. वैभव तुळशीनाथ भोर

२) श्री. विक्रम तुळशीनाथ भोर

३) सौ. वैशाली (राणी) बाबासाहेब काळे

ही अपत्ये आहेत.

**आधुनिक शेतीचा प्रयोगशील प्रवास**

सन १९८० मध्ये कृषी पदवी पूर्ण केल्यानंतर स्व. प्रभाकरराव भोर साहेब यांच्या आग्रहास्तव अण्णांनी नोकरीचा मार्ग न स्वीकारता आधुनिक शेती करण्याचा निर्णय घेतला. पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत त्यांनी शेतीमध्ये अनेक प्रयोग केले. टोमॅटो, आंबा, द्राक्षे, सीताफळ, अंजीर, ॲपल बोर, पेरू यांसारखी विविध फळपिके घेऊन त्यांनी शेतीमध्ये उल्लेखनीय यश मिळविले.

**वडिलांच्या कार्याचा वारसा पुढे नेला**

माळेगाव पठार परिसरातील घराघरात आजही स्व. प्रभाकरराव भोर साहेबांचे कार्य आदराने स्मरण केले जाते. परिसरातील मुला-मुलींना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी केलेले कार्य ऐतिहासिक होते.

शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी मिळावी, त्यांचे जीवनमान उंचवावे, हा स्व. भोर साहेबांचा विचार होता. हाच विचार पुढे नेत अण्णा भोर साहेबांनी शिक्षण, सहकार आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले.

**वडिलांच्या निधनानंतर मोठी जबाबदारी पेलली**

सन १९९० हे वर्ष भोर परिवारासाठी तसेच माळेगाव पठार परिसरासाठी अत्यंत दुःखद ठरले. महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन, मुंबईचे उपाध्यक्ष असलेले स्व. प्रभाकरराव भोर साहेब यांचे २४ सप्टेंबर १९९० रोजी ब्रीच कँडी हॉस्पिटल, मुंबई येथे आजाराने निधन झाले. स्व. प्रभाकरराव भोर साहेब यांच्या निधनाने केवळ भोर परिवारावरच नव्हे तर संपूर्ण संगमनेर तालुक्यातील सहकार, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रावर मोठी पोकळी निर्माण झाली. माळेगाव पठार परिसरातील विकासाचा एक मजबूत आधारवड असलेले नेतृत्व हरपले.

अशा कठीण प्रसंगी कुटुंबातील थोरले सदस्य म्हणून कै. तुळशीनाथ (अण्णा) भोर साहेब यांनी मोठ्या धैर्याने जबाबदारी स्वीकारली. वडिलांनी उभारलेल्या सामाजिक विश्वासाला तडा जाऊ न देता त्यांनी शेती, सहकार, शिक्षण आणि सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेला.

माळेगाव येथील जिरायत शेती असो किंवा आंबीखालसा येथील बागायत शेती असो, अण्णांनी अत्यंत प्रामाणिकपणे, निःस्वार्थ भावनेने आणि कष्टाच्या जोरावर शेती केली. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले.

**सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान**

स्व. प्रभाकरराव भोर साहेबांच्या निधनानंतर अण्णा भोर साहेबांना आंबी-माळेगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीवर संचालक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पुढील काळात त्यांनी या संस्थेचे चेअरमन पद भूषवून सहकाराची धुरायशस्वीपणे सांभाळली. सहकार क्षेत्र हे ग्रामीण विकासाचे महत्त्वाचे माध्यम आहे, या विचाराने त्यांनी शेतकरी, सभासद आणि सामान्य नागरिकांच्या हिताला नेहमी प्राधान्य दिले.

संगमनेर तालुका सहकारी साखर कारखाना, सहकारी संस्था आणि विविध सामाजिक संस्थांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. त्यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, शिस्त आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती होती.

त्यांनी विविध संस्थांमध्ये दिलेल्या जबाबदाऱ्या :

- संगमनेर भाग सहकारी संघावर ३१ वर्षे संचालक म्हणून योगदान
- अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेवर ११ वर्षे विश्वस्त
- सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेवर सुमारे २० वर्षे सहसचिव व ५ वर्षे खजिनदार म्हणून कार्य
- संगमनेर तालुका सुतगिरणीच्या चेअरमन पदाची जबाबदारी
- या माध्यमातून त्यांनी सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

**प्रभाकरराव भोर विद्यालयाच्या स्थापनेत मोलाचे योगदान**

स्व. प्रभाकरराव भोर साहेबांची स्मृती कायम राहावी आणि आंबी-माळेगाव परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, या उदात्त हेतूने सन १९९१ मध्ये सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेचे प्रभाकरराव भोर विद्यालय सुरू करण्यात आले. सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात (दादा) यांच्या संकल्पनेतून आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने या विद्यालयाची स्थापना झाली. सुरुवातीच्या काळात हे विद्यालय विनाअनुदान तत्त्वावर सुरू झाले. त्या कठीण परिस्थितीत अण्णा भोर साहेबांनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि संस्थेतील सहकाऱ्यांना कुटुंबातील सदस्याप्रमाणे सांभाळले.

शाळेतील गुणवत्तेबाबत त्यांनी कधीही तडजोड केली नाही. शिक्षकांना प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे लक्ष देणे आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण निर्माण करणे यावर त्यांचा विशेष भर होता.

विनाअनुदानित काळात शिक्षकांचे मानधन देण्यासाठी त्यांनी सहकाऱ्यांच्या माध्यमातून मोठे प्रयत्न केले. त्यांच्या चिकाटीमुळे आणि मा. ना. बाळासाहेब थोरात साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. सुधीरजी तांबे यांच्या सहकार्यामुळे सन १९९५-९८ या कालावधीत विद्यालयाला १०० टक्के अनुदान प्राप्त झाले.

**शिक्षणासाठी जमीन आणि भव्य शैक्षणिक संकुल उभारणी**

विद्यालयासाठी स्वतंत्र इमारत असावी, विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची सुविधा मिळावी, हा अण्णा भोर साहेबांचा कायम आग्रह होता. आंबी-माळेगाव परिसरातील मारुती मंदिर देवस्थानच्या विश्वस्तांनी आणि ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्यामुळे विद्यालयासाठी जमीन उपलब्ध झाली. धर्मादाय आयुक्त अहमदनगर व पुणे कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करून ही प्रक्रिया पूर्ण करण्यात अण्णांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पुढे ग्रामपंचायत आंबीखालसा, ग्रामस्थ आणि सह्याद्री संस्थेच्या सहकार्याने विद्यालयासाठी भव्य शैक्षणिक संकुल उभे राहिले.

या संकुलामध्ये :

- २० वर्गखोल्यांची सुसज्ज इमारत
- आधुनिक प्रयोगशाळा
- समृद्ध ग्रंथालय
- डिजिटल स्मार्ट बोर्ड व इंटरॅक्टिव्ह शिक्षण व्यवस्था
- भव्य क्रीडांगण
- विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृह व्यवस्था
- सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था
- विविध स्पर्धा परीक्षांसाठी सुविधा

अशा अनेक आधुनिक सुविधा निर्माण करण्यात आल्या. विद्यालयाच्या परिसरात हिरवाई, बाग-बगीचा, वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण मिळावे यासाठी अण्णांनी विशेष लक्ष दिले.

स्व. प्रभाकरराव भोर साहेबांच्या स्मृतीचा जागर आणि विचारांचा वारसा स्व. प्रभाकरराव भोर साहेबांचे कार्य आणि विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचावेत, तसेच सहकार, शेती, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचे स्मरण कायम राहावे, या उद्देशाने दरवर्षी २४ सप्टेंबर रोजी प्रभाकरराव भोर साहेबांची पुण्यतिथी मोठ्या आदराने साजरी करण्यात येत असे.

या कार्यक्रमाचे स्वरूप केवळ श्रद्धांजलीपर्यंत मर्यादित नव्हते, तर तो एक वैचारिक मेळावा असायचा. या कार्यक्रमासाठी सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात (दादा), महाराष्ट्राचे माजी मंत्री मा. ना. बाळासाहेब थोरात साहेब सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. सुधीरजी तांबे तसेच तालुक्यातील सहकार, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित राहत असत. या निमित्ताने सहकार, शेती, शिक्षण आणि ग्रामीण विकास या विषयांवर विचारमंथन केले जात असे. महाराष्ट्रातील अनेक नामवंत व्यक्तींना या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले जात असे. उपस्थित श्रोत्यांसाठी हा कार्यक्रम एक प्रकारची वैचारिक मेजवानीच ठरत असे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण कै. तुळशीनाथ (अण्णा) भोर साहेब करत असत. आपल्या वडिलांच्या वक्तृत्वशैलीचा वारसा त्यांनी समर्थपणे जपला.

**प्रभावी वक्तृत्व आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण**

तुळशीनाथ अण्णा भोर साहेबांचे वक्तृत्व हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना त्यांनी नेहमी आपल्या भाषणातून आवाज दिला.

त्यांच्या भाषणांमध्ये :

- शेतकऱ्यांच्या अडचणी, शेतमालाचे बाजारभाव
- आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी,
- विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या संधी,
- राज्य सरकारची शेतीविषयक धोरणे,
- ग्रामीण भागाचा विकास

या विषयांवर ते अत्यंत अभ्यासपूर्ण आणि मनमोकळेपणाने विचार मांडत असत. त्यांच्या भाषणाची खासियत म्हणजे गंभीर विषयही ते साध्या, विनोदी आणि सहज शैलीत मांडत असत. उपस्थितांना विचार करायला लावणारे आणि त्याच वेळी चेहऱ्यावर हास्य आणणारे त्यांचे वक्तृत्व सर्वांच्या स्मरणात राहिले. अण्णांच्या मांडणीतील वास्तवता आणि शेतकरी जीवनाची जाण यामुळे त्यांच्या विचारांची दखल मान्यवर नेत्यांकडूनही घेतली जात असे.

**शिक्षण क्षेत्रातील त्यांचे समर्पित योगदान**

प्रभाकरराव भोर विद्यालय हे अण्णा भोर साहेबांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचे कार्य होते. विद्यालय केवळ इमारत नसून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे केंद्र बनावे, अशी त्यांची भावना होती. विद्यालयातील प्रत्येक बाबीकडे त्यांचे बारकाईने लक्ष असायचे. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे, शिक्षकांना योग्य वातावरण मिळावे आणि शाळेची गुणवत्ता सातत्याने वाढावी यासाठी ते प्रयत्नशील असत. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी ते कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागत. काम करणाऱ्या व्यक्तींना ते नेहमी प्रोत्साहन देत. मात्र शैक्षणिक कामकाजातील त्रुटी आढळल्यास ते स्पष्टपणे सूचना देऊन त्या सुधारण्यावर भर देत. त्यांचा स्वभाव परखड होता, पण त्यामागे संस्थेच्या आणि विद्यार्थ्यांच्या हिताची भावना असायची.

**शिक्षकांविषयी जिव्हाळा आणि संस्थेविषयी निष्ठा**

प्रभाकरराव भोर विद्यालयाच्या उभारणीच्या काळात अनेक अडचणी होत्या. विनाअनुदानित काळात शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन अण्णांनी त्यांना आधार दिला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेकडे लक्ष द्यावे, आधुनिक शिक्षण पद्धती स्वीकाराव्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करावे, अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांच्या कार्यामुळे विद्यालयाने ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी संस्था म्हणून आपली ओळख निर्माण केली.

**दूरदृष्टी असलेले नेतृत्व**

तुळशीनाथ अण्णा भोर साहेब यांचे व्यक्तिमत्त्व अनेक गुणांनी समृद्ध होते. शेतीतील प्रयोगशीलता, सहकारातील अनुभव, शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी आणि सामाजिक बांधिलकी या सर्वांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यात दिसून येतो. त्यांनी कधीही पदाचा किंवा प्रतिष्ठेचा अभिमान बाळगला नाही. सामान्य माणसाशी आपुलकीने संवाद साधणे, कार्यकर्त्यांचा सन्मान करणे आणि सर्वांना सोबत घेऊन चालणे ही त्यांची कार्यपद्धती होती.

**सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा वारसा**

कै. तुळशीनाथ (अण्णा) प्रभाकरराव भोर साहेब यांचे जीवन म्हणजे केवळ पदे, जबाबदाऱ्या आणि संस्था यापुरते मर्यादित नव्हते, तर ते माणुसकी, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होते. वडील स्व. प्रभाकरराव भोर साहेब यांनी निर्माण केलेली सामाजिक विश्वासाची परंपरा अण्णांनी अत्यंत जपली. गावातील सामान्य शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नागरिक यांच्याशी त्यांचे नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. अण्णांच्या स्वभावातील सर्वात मोठा गुण म्हणजे सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती. कोणत्याही व्यक्तीशी संवाद साधताना त्यांनी कधीही मोठेपणाचा आव आणला नाही.

**कार्यकर्त्यांचा सन्मान आणि सहकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते**

तुळशीनाथ अण्णा भोर साहेबांनी आपल्या वडिलांसोबत काम केलेल्या जुन्या कार्यकर्त्यांचा नेहमी आदर केला. स्व. प्रभाकरराव भोर साहेबांचे सहकारी म्हणजे आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य आहेत, या भावनेने त्यांनी त्यांच्याशी नाते जपले. संस्था चालवताना त्यांनी पदापेक्षा माणसांना महत्त्व दिले. प्रत्येक कार्यकर्त्याच्या मताचा आदर करणे, योग्य व्यक्तीला योग्य संधी देणे आणि संस्थेच्या विकासासाठी सर्वांचे सहकार्य घेणे ही त्यांची कार्यपद्धती होती. त्यांच्या नेतृत्वात काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी प्रोत्साहन दिले. नवीन पिढीतील युवकांनी शिक्षण, शेती आणि सामाजिक कार्यात पुढे यावे, अशी त्यांची कायम भूमिका होती.

**शिक्षण क्षेत्रातील आदर्श व्यवस्थापन**

प्रभाकरराव भोर विद्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे मोठे कार्य अण्णांनी केले. विद्यालयाच्या प्रगतीसाठी त्यांनी केवळ मोठ्या योजना आखल्या नाहीत, तर त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

विद्यालयात :

- विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळावे,
- शिक्षकांना चांगले शैक्षणिक वातावरण मिळावे,
- विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सातत्याने वाढ व्हावी,
- क्रीडा, सांस्कृतिक आणि स्पर्धा परीक्षा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी प्रगती करावी,

यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. शाळेतील प्रत्येक छोट्या-मोठ्या बाबीकडे त्यांचे लक्ष असायचे. परिसर स्वच्छ असावा, विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, ग्रंथालय समृद्ध असावे, खेळासाठी मैदान उपलब्ध असावे यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

**शेती आणि शेतकऱ्यांविषयी असलेली तळमळ**

स्वतः प्रयोगशील शेतकरी असल्यामुळे अण्णांना शेतकऱ्यांच्या समस्या जवळून माहिती होत्या. शेतमालाला योग्य बाजारभाव मिळावा, शेती आधुनिक पद्धतीने केली जावी आणि शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा, यासाठी ते नेहमी आग्रही असत. शेतकऱ्यांशी चर्चा करताना ते केवळ समस्या ऐकत नसत, तर त्यावर उपाय सुचवण्याचा प्रयत्न करत. नवीन पिके, आधुनिक तंत्रज्ञान, फळबाग लागवड आणि शेतीतील नियोजन याबाबत ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत असत.

**साधेपणा आणि स्पष्टवक्तेपणा**

तुळशीनाथ अण्णा भोर साहेब यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे त्यांचा साधेपणा. मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळूनही त्यांनी सामान्य माणसाशी असलेले नाते कधीही बदलू दिले नाही. त्यांचा स्वभाव स्पष्ट होता. चुकीच्या गोष्टींना विरोध करणे आणि योग्य गोष्टींसाठी ठामपणे उभे राहणे ही त्यांची ओळख होती. त्यांच्या स्पष्टवक्तेपणामध्ये संस्थेचे आणि समाजाचे हित दडलेले असायचे.

**एक आदर्श कुटुंबप्रमुख**

वडिलांच्या निधनानंतर त्यांनी केवळ सामाजिक जबाबदारीच नाही तर कुटुंबाची जबाबदारीही समर्थपणे सांभाळली. भावंडांना आधार देणे, कुटुंबातील प्रत्येक सदस्याची काळजी घेणे आणि सर्वांना एकत्र ठेवणे हे त्यांनी मोठ्या प्रेमाने केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कर्तव्यनिष्ठा, प्रेम, शिस्त आणि संस्कार यांचा सुंदर मिलाफ होता.

**अण्णांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा**

**– मा. नानासाहेब तबाजी भोर**
**ज्येष्ठ शिक्षक**
**प्रभाकर भोर विद्यालय, आंबीखालसा**

कै. तुळशीनाथ (अण्णा) प्रभाकरराव भोर साहेब यांनी आपल्या आयुष्यात शेती, सहकार, शिक्षण आणि समाजसेवा या चारही क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान दिले. त्यांनी उभारलेल्या संस्था, त्यांनी दिलेले विचार आणि त्यांनी निर्माण केलेली माणसे हा त्यांच्या कार्याचा खरा वारसा आहे. आजही माळेगाव पठार परिसरातील अनेक विद्यार्थी, शिक्षक, शेतकरी आणि कार्यकर्ते त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आहेत. अण्णांचे जीवन हे सांगते की, पद मिळविण्यापेक्षा जबाबदारी पार पाडणे महत्त्वाचे असते आणि नाव कमावण्यापेक्षा माणसांच्या मनात स्थान निर्माण करणे मोठे असते.

**अण्णांच्या कार्यातून निर्माण झालेली प्रेरणादायी परंपरा**

कै. तुळशीनाथ (अण्णा) प्रभाकरराव भोर साहेब यांचे संपूर्ण आयुष्य हे समाजासाठी समर्पित होते. वडिलांकडून मिळालेला समाजसेवेचा वारसा त्यांनी केवळ जपला नाही, तर आपल्या कर्तृत्वाने तो अधिक समृद्ध केला. शेती, सहकार, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य हे एका व्यक्तीच्या प्रयत्नांपेक्षा एका चळवळीचे स्वरूप घेणारे होते. ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा आणि गावाचा सर्वांगीण विकास व्हावा, ही त्यांची कायमची भूमिका होती.

**प्रभाकरराव भोर विद्यालय : अण्णांच्या स्वप्नपूर्तीचे केंद्र**

प्रभाकरराव भोर विद्यालय हे अण्णा भोर साहेबांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणे आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आजही प्रेरणादायी आहेत. विद्यालयाच्या उभारणीपासून ते विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर अण्णांचे लक्ष होते. केवळ भव्य इमारत उभी करणे हा त्यांचा उद्देश नव्हता, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देणे हे त्यांचे ध्येय होते. विद्यालयात शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन यांना त्यांनी महत्त्व दिले.

**शिक्षक आणि कर्मचाऱ्यांसाठी आधारवड**

अण्णा भोर साहेब यांचे शिक्षकांशी असलेले नाते अत्यंत जिव्हाळ्याचे होते. शिक्षक हे संस्थेचे खरे आधारस्तंभ आहेत, अशी त्यांची भावना होती. शिक्षकांच्या अडचणी समजून घेणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कार्याचा योग्य सन्मान करणे यावर त्यांचा भर होता. विद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांनी कधीही केवळ कर्मचारी म्हणून पाहिले नाही, तर संस्थेच्या कुटुंबातील सदस्य मानले. त्यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या अनेक शिक्षकांच्या मनात आजही अण्णांविषयी आदर आणि आपुलकीची भावना आहे.

**सहकार आणि सामाजिक क्षेत्रातील विश्वासार्ह नेतृत्व**

अण्णा भोर साहेबांनी सहकार क्षेत्रात काम करताना नेहमी सर्वसामान्य सभासदांच्या हिताला प्राधान्य दिले. सहकार म्हणजे केवळ संस्था चालविणे नसून ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करण्याचे माध्यम आहे, असा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी संस्थेच्या विकासासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले. निर्णय घेताना दूरदृष्टी, पारदर्शकता आणि सर्वांच्या हिताचा विचार ही त्यांची कार्यपद्धती होती.

**विचारांचा वारसा पुढे नेणारे व्यक्तिमत्त्व**

तुळशीनाथ अण्णा भोर साहेबांचे जीवन हे संघर्ष, मेहनत आणि सेवाभाव यांचे उदाहरण आहे. वडिलांचे कार्य पुढे नेताना त्यांनी अनेक आव्हानांचा सामना केला. मात्र परिस्थितीसमोर हार न मानता त्यांनी प्रत्येक जबाबदारी समर्थपणे पार पाडली.

**अण्णांच्या आठवणी सदैव जिवंत राहतील**

एखाद्या व्यक्तीचे खरे मोठेपण त्याच्या पदामध्ये नसते, तर त्याने किती माणसे जोडली आणि समाजासाठी किती योगदान दिले यामध्ये असते. कै. तुळशीनाथ (अण्णा) प्रभाकरराव भोर साहेब यांनी आपल्या प्रेमळ स्वभावाने, कार्यक्षम नेतृत्वाने आणि सामाजिक बांधिलकीने असंख्य माणसे जोडली. आज माळेगाव पठार परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, शिक्षक, कार्यकर्ते आणि नागरिक त्यांच्या कार्याची आठवण अभिमानाने काढतात. त्यांनी उभारलेल्या संस्था, दिलेले संस्कार आणि निर्माण केलेली विश्वासाची परंपरा हीच त्यांच्या जीवनाची खरी ओळख आहे.

सहकार, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील आधारवड, पितृतुल्य व्यक्तिमत्त्व आदरणीय तीर्थरूप कै. तुळशीनाथ (अण्णा) प्रभाकरराव भोर साहेब यांना विनम्र अभिवादन..



**अण्णांनी भूषविलेली पदे**

**संगमनेर शेतकी सहकारी संघ लि., संगमनेर**
१९९१ ते २०२२ - संचालक
१९९३ ते १९९४ - व्हा. चेअरमन

**सह्याद्री बहु. विद्या प्रसारक समाज, संगमनेर**
१९९७ ते २००० - संचालक
२००० ते २०२० - सह सेक्रेटरी (२० वर्षे)
२०२० ते २०२५ - खजिनदार (५ वर्षे)
२०२५ ते ३/९/२०२६ - संचालक

**संगमनेर सहकारी सुत गिरणी - चेअरमन**

**आंबी माळेगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटी**
१९९१ ते २०२२ - संचालक
१९९३ ते १९९८ - चेअरमन

**म. गांधी तंटामुक्ती समिती, आंबी खालसा**
२०१० ते २०१५ - अध्यक्ष
संगमनेर तालुक्यात प्रथम क्रमांक
(ग्रा.पं. आंबी खालसा) बक्षीस ३ लाख रूपये

**सह्याद्री बहु. विद्या प्रसारक समाज, संगमनेर**
आदर्श शाळा पुरस्कार - द्वितीय क्रमांक
बक्षीस १ लाख रूपये

**अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था**
विश्वस्त - ११ वर्षे


संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व
कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर
यांना || भावपूर्ण श्रध्दांजली ||

मा. श्री. लहानुभाऊ गुंजाळ
अध्यक्ष, खांडेश्वर महादेव मंदीर ट्रस्ट, खांडगाव
मा. श्री. रमेश लहानुभाऊ गुंजाळ
संचालक, राजहंस दुध, संगमनेर

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व
कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर
यांना || भावपूर्ण श्रध्दांजली ||
श्री. गोकुळ दिनकर कहाणे (गुरूजी)
कार्याध्यक्ष जिल्हा उच्चअधिकार समिती
प्राथ. शिक्षक संघ अहिल्यानगर
मा. चेअरमन आंबी माळेगाव वि.का. से. सो. आंबीखालसा
श्री. पंढरीनाथ बबन कहाणे
मा. उपसरपंच ग्रा. पं. आंबीखालसा
मा. चेअरमन आंबी माळेगांव वि.का. से. सो.
मा. अध्यक्ष - स्थानिक स्कुल कमिटी
प्रभाकरराव भोर विद्यालय आंबीखालसा

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व
कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर
यांना || भावपूर्ण श्रध्दांजली ||
श्री. बाळासाहेब निवृत्ती ढोले ( सरपंच)
श्री. दत्तात्रय बन्सी कान्होरे
(अध्यक्ष) म. गांधी तंटामुक्त समिती
श्री. सुरेश धोंडीराम गाडेकर
(अध्यक्ष) ग्रामशिक्षण समिती
श्री. दिपक सर्जेराव ढमढेरे
(अध्यक्ष) ग्राम पाणी पुरवठा समिती
श्री. संतोष सुरेश घाटकर
(अध्यक्ष) संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान
ग्रामपंचायत आंबीखालसा

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व
कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर
यांना || भावपूर्ण श्रध्दांजली ||
श्री. दिलीप करूजी शिंदे
(अध्यक्ष) शालेय व्यवस्थापन समिती
श्री. शौकत मेहमूद पटेल
(उपाध्यक्ष) शालेय व्यवस्थापन समिती)
श्री. मंगेश बबन गाडेकर (अध्यक्ष) माजी विद्यार्थी संघ
श्री. महेंद्र सुदाम भोर (उपाध्यक्ष) माजी विद्यार्थी संघ
सौ. सुप्रिया हिम्मत ढमढेरे
(अध्यक्ष) सखी सावित्री समिती
प्रभाकर भोर विद्यालय, आंबीखालसा

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व
कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर
यांना || भावपूर्ण श्रध्दांजली ||
मुख्याध्यापक सर्व शिक्षकवृंद,
पालक आणि विद्यार्थी
शालेय व्यवस्थापन समिती
( अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य)
जि .प. प्राथ. शाळा आंबीखालसा,
माळेगांव पठार, गणपीरदरा, तांगडी,
माळवदवाडी, गोडेवाडी, धादवडवाडी

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व कै. तुळशीराम प्रभाकर भोर यांना भावपूर्ण श्रध्दांजली !
सुरेशराव लक्ष्मण आहेर
अत्तर सय्यद | दादापाटील आहेर | दिलीप आहेर | सुभाष पा. आहेर | राजेंद्र आहेर | किशोर डोके | शिवाजी आहेर | रंगनाथ लांडगे | शांताराम गाडेकर | ज्ञानदेव गडगे | आनंदा नाथा गाडेकर | कारभारी वाकळे

# कै. तुळशीराम प्रभाकर भोर यांना भावपूर्ण श्रद्धांजली



संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व

## कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

**स्थानिक स्कुल कमिटी**

**प्रभाकरराव भोर विद्यालय, आंबी खालसा, ता. संगमनेर**

श्री. सुरेश रामचंद्र कान्होरे - अध्यक्ष
श्री. सर्जेराव गुलाबराव ढमढेरे - सदस्य
श्री. अरूण लक्ष्मण कान्होरे - सदस्य
श्री. सुरेश धोंडिभाऊ गाडेकर - सदस्य
श्री. सुनिल केशव दुधवडे - सदस्य
श्री. पंढरीनाथ बबन कहाणे - सदस्य
श्री. बाळासाहेब संतु कदम - सदस्य
श्री. अत्तरशेठ आबुभाई सय्यद - सदस्य
श्री. सुनिल शंकर घाटकर - सदस्य
श्री. अनाजी भाऊ मधे - सदस्य
श्री. चंद्रकांत गणपत कहाणे - सदस्य
श्री. बाळासाहेब निवृत्ती ढोले - सदस्य
दत्तात्रय बन्सी कान्होरे - सदस्य
गोकुळ दिनकर कहाणे - सदस्य
श्री. शशांक विलास खोजे - मुख्याध्यापक
श्री. नानासाहेब तबाजी भोर - शिक्षक प्रतिनिधी

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्व नेतृत्व, संगमनेर शेतकी सह. संघाचे माजी संचालक



## कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर

यांना

॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

- शोकाकूल -

**मा. श्री. दत्तात्रय गडगे**

**मा. श्री. बाळासाहेब गाडेकर**

श्री लक्ष्मी ट्रेडींग कंपनी (LTC), संगमनेर



संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व,
संगमनेर शेतकी सह. संघाचे माजी संचालक

## कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

**सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर**

संस्था पदाधिकारी, संचालक मंडळ व कर्मचारी वृद

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्ववान नेतृत्व, संगमनेर शेतकी सह. संघाचे माजी संचालक



## कै. तुळशीनाथ प्रभाकर भोर (अण्णा)

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

**संगमनेर शेतकी सहकारी संघ लि. संगमनेर**

सुदर्शन प्रभा, कॉलेज रोड, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर

**मा. लोकनेते बाळासाहेब थोरात**
(माजी महसूलमंत्री, महाराष्ट्र राज्य)

**मा. आ. डॉ. सुधीर तांबे**
(मा. सदस्य विधान परिषद, मुंबई)

**मा. आमदार सत्यजीत दादा तांबे**
(सदस्य, विधानपरिषद)

**डॉ. जयश्रीताई थोरात**
(अध्यक्षा, संगमनेर तालुका काँग्रेस कमिटी)

**इंद्रजीत भाऊ थोरात** (संचालक, स.म.भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, संगमनेर)

**मा. श्री. संपतराव विष्णू डोंगरे**
(चेअरमन)

**मा. श्री. सुनिल जयराम कडलग**
(व्हा. चेअरमन)

**मा. श्री. अनिल ज्ञानदेव थोरात**
(मॅनेजर)

– संचालक मंडळ –

मा. श्री. साहेबराव बाबुराव बारवे
मा. श्री. भाऊसाहेब सावळेराम नवले
मा. श्री. शिवाजी सुखदेव आहेर
मा. श्री.भास्कर पाटीलबा गोपाळे
मा. श्री. बाळकृष्ण ठकाजी होडगर
मा. श्री. संतोष रामभाऊ नागरे
मा. श्री. प्रभाकर संभाजी सोनवणे
मा. श्री. विनायक बाजीराव काळे
ॲड. श्री. ज्ञानेश्वर हरिभाऊ सांगळे
मा. श्री. तुकाराम रामभाऊ कोठवळ
मा. श्री.महादू सखाराम खेमनर
मा. सौ. मंगल कैलास ठाकरे
मा. श्री. किरण भागाजी नवले
मा. श्री. सचिन रामनाथ दिघे
मा. श्री. संजय सहादू क्षीरसागर
मा. सौ. प्रभावती ज्ञानदेव ढोकरे

मा. उपनिबंधक साहेब,सह संस्था

**संगमनेर शेतकी सह. संघ लि. संगमनेर सर्व संचालक मंडळ,सभासद वर्ग, अधिकारी व कर्मचारी वृंद**

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्व नेतृत्व, संगमनेर शेतकी सह. संघाचे माजी संचालक



## स्व. तुळशीनाथ प्रभाकरराव भोर

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

### ग्रामपंचायत कार्यालय, आंबीखालसा

**श्री. बाळासाहेब निवृत्ती ढोले (सरपंच)**
**श्री. रशिद याकुब सय्यद (उपसरपंच)**
**श्री. एन. जी भोपेसाहेब (ग्रामपंचायत अधिकारी)**

श्री. दिलिप किसन हांडे (सदस्य)
श्री. दिपक उत्तम गावडे (सदस्य)
सौ. अंजली सुरेश गाडेकर (सदस्या)
सौ. सुवर्णा संजय गडगे (सदस्या)
सौ. शुभांगी अमोल कहाने (सदस्या)
श्री. विलास किसन माने (क्लार्क)
श्री. विलास सोमनाथ मधे (सदस्य)
सौ. मनिषा बाळासाहेब गाडेकर (सदस्या)
सौ. अनिता सखाहरी तांगडकर (सदस्या)
सौ. अंजना एकनाथ जाधव (सदस्या)
सौ. अश्विनी जितेंद्र भोर (कॉम्प्युटर ऑपरेटर)
श्री. आविनाश शांताराम भोर (कर्मचारी)
श्री. शंकर रामभाऊ मुंढे (कर्मचारी)

संगमनेर पठार भागाचे कर्तृत्व नेतृत्व, संगमनेर शेतकी सह. संघाचे माजी संचालक



## स्व. तुळशीनाथ प्रभाकरराव भोर

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

### प्रभाकरराव भोर विद्यालय, आंबीखालसा

- कर्मचारी मंडळ-

श्री. खोजे शशांक विलास (मुख्याध्यापक)
श्रीम. गागरे जया काशिनाथ (सहा. शिक्षिका)
श्री. कोंका गणेश दत्तात्रय (सहा. शिक्षक)
श्री. साबळे आण्णा कृष्णा (सहा. शिक्षक)
श्रीम. बनसोडे सुनिता मुक्ता (शिपाई)
श्रीम. जमुना मनोहर पापळ (स्वयंपाकी)
श्री. वाडेकर अनिल भाऊसाहेब (बसचालक)
श्री. भोर नानासाहेब तबाजी (सहा. शिक्षक)
श्रीम. घुले विजया पुंजा (सहा. शिक्षिका)
श्री. जोंधळे अमोल वसंतराव (सहा. शिक्षक)
श्री. गोडे दिलीप शंकर (क. लिपिक)
श्री. थोरात संदीप पोपटराव (ग्रंथपाल)
श्री. पापळ सोमनाथ मनोहर (मदतनिस)
श्री. सय्यद बाबा आबुभाई (मदतनिस)



संगमनेर पठार भागाचे कर्तृत्व नेतृत्व, संगमनेर शेतकी सह. संघाचे माजी संचालक

## स्व. तुळशीनाथ प्रभाकरराव भोर

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

### मुळाखोरे सह. दुध उत्पादक संस्था मर्या. आंबीखालसा

- संचालक मंडळ-

श्री. अरूण लक्ष्मण कान्होरे (चेअरमन)
श्री. सुभाष आण्णासाहेब ढमढेरे (संचालक)
श्री. अशोक भगवंत ढमढेरे (संचालक)
सौ. सौदामिनी अरूण कान्होरे (संचालिका)
श्री. महादु ज्ञानदेव भुजबळ (संचालक)
श्री. गणेश महादु भोर (व्हा. चेअरमन)
श्री. बाळासाहेब बन्सी कान्होरे (संचालक)
श्री. भाऊसाहेब सोन्याबापू ढमढेरे (संचालक)
सौ. ललिता गणेश भोर (संचालिका)
श्री. राहुल विलास हांडे (सेक्रेटरी)
सौ. सरला शंकर मुंढे (मदतनीस)



संगमनेर पठार भागाचे कर्तृत्व नेतृत्व, संगमनेर शेतकी सह. संघाचे माजी संचालक

## स्व. तुळशीनाथ प्रभाकरराव भोर

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

### आंबी-माळेगाव वि.वि.सेवा सह. सो. लि.,आंबीखालसा

**श्री. प्रताप सहादु भोर (चेअरमन)**
**श्री. श्रीधर भागुजी कहाणे (व्हा. चेअरमन)**

श्री. सुरेश रामचंद्र कान्होरे, सौ. जुलेखा अत्तर सय्यद,
श्री. तुकाराम गेणु गडगे, श्रीमती. सुरेखा भाऊसाहेब कान्होरे
श्री. रामदास सोपान भोर, श्री. पंढरीनाथ ज्ञानदेव गाडेकर
श्री. पांडुरंग रखमा तांगडकर, श्री. गोरक्ष मधुकर सोनवणे
श्री. तुकाराम रघुनाथ कजबे, श्री. गणेश माधव भोर



संगमनेर पठार भागाचे कर्तृत्व नेतृत्व, संगमनेर शेतकी सह. संघाचे माजी संचालक

## स्व. तुळशीनाथ प्रभाकरराव भोर

यांना ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥

शोकाकूल

### मुळेश्वर महिला सह. दुध उत्पादक संस्था मर्या. आंबीखालसा

**सौ. अलका भाऊसाबेह पा. ढमढेरे (चेअरमन)**
**सौ. अरीफा जासुद्दिन शेख (व्हा. चेअरमन) श्री. धनंजय शिवाजी हांडे (सचिव)**

- संचालक मंडळ-

सौ. अंजली सुरेश गाडेकर (सदस्या)
श्रीमती. शांताबाई लक्ष्मण गाडेकर (सदस्या)
सौ. निर्मला रामदास गगे (सदस्य)
सौ. गुलजान ईसमाईल शेख (सदस्या
सौ. नंदा रामदास काशिद (सदस्या)
सौ. संगिता कैलास पापळ, (सदस्या)
सौ. चंद्रकला दिलीप कहाणे (सदस्या)
सौ. उषा रमेश शिंदे (सदस्या)
श्री. लक्ष्मण बाबुराव कचरे (शिपाई)

# कै. तुळशीनाथ भोर : शिक्षण, शेती आणि कर्तव्याची वाटचाल

तुळशीनाथ हा माझा चुलत भाऊ. आमच्यामध्ये मी त्याच्यापेक्षा एक वर्षाने मोठा आहे. तुळशीनाथचे चौथीपर्यंतचे शिक्षण मालेगाव येथे झाले. त्यानंतर त्याला भोर साहेबांनी नुकत्याच सुरू झालेल्या, सन १९६४ मध्ये प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरानगर येथे पुढील शिक्षणासाठी पाठवले. बहुतेक, त्या काळात हे महाराष्ट्रातील पहिले पब्लिक स्कूल असावे.

इंग्लिश मीडियम स्कूल असल्यामुळे तुळशीनाथला वाचनाची खूप आवड निर्माण झाली. मे महिन्याच्या किंवा दिवाळीच्या सुट्टीनंतर मीच पालक म्हणून तुळशीनाथला स्कूलमध्ये सोडण्यासाठी जात असे. पुढे त्याने त्याकाळी प्रसिद्ध असलेले 'रीडर्स डायजेस्ट' हे पुस्तकही आवडीने वाचले. त्यावेळेस पब्लिक स्कूलचे प्राचार्य आठरे सर यांचा तुळशीनाथवर खूप प्रभाव पडला.

पुढे अकरावीनंतर तुळशीनाथने पुणे येथील शासकीय कृषी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला व B.Sc. Agri. ही पदवी संपादन केली. त्यावेळेस मीही पुण्यातच वैद्यकीय शिक्षणासाठी होतोच. त्यामुळे तेथेही आमची नेहमी भेट होत असे. असेच एकदा सुट्टीत आम्ही संगमनेरला गेलो होतो. भोर साहेब शेतकी संघाचे चेअरमन होते. त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो असता, ते म्हणाले, तुळशीनाथची कटिंग करून आण. आम्ही दोघे गेलो. तुळशीनाथने न्हाव्याला, जास्त केस कमी करू नका, असे सांगितले.



कटिंग झाल्यावर आम्ही परत संघाच्या ऑफिसमध्ये गेलो. थोडा वेळ बाहेर बसलो. भोर साहेब ऑफिसमधून बाहेर आले आणि तुळशीनाथकडे बघून म्हणाले, अरे, कटिंग का नाही केली?

आम्ही गप्पच! मग त्यांनी म्हटले, चल, कटिंग करायला. आणि परत त्याच न्हाव्याकडे नेले. न्हावी भोर साहेबांना म्हणाला, याने तर आत्ताच कटिंग केली आहे. पण भोर साहेबांनी सांगितल्यावर तुळशीनाथची परत कटिंग केली आणि भरपूर केस कमी केले. आम्ही नंतर बराच वेळ नुसतेच हसत राहिलो. तुळशीनाथने B.Sc. Agri. फर्स्ट क्लासमध्ये उत्तीर्ण झाल्यानंतर घरी शेती पाहण्यास सुरुवात केली. वास्तविक, त्याकाळी नोकरी सहजासहजी मिळत असूनही शेतीला प्राधान्य देत तुळशीनाथ शेतीकडे वळला आणि उत्तम शेती केली. त्याचे टोमॅटोचे प्लॉट बघण्यासाठी दुरून लोक यायचे. एग्रीकल्चरल ग्रॅज्युएट असल्यामुळे त्याने शेतीतील नवनवीन प्रयोग केले आणि ते यशस्वीही झाले. त्यानंतर भोर साहेब गेल्यानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी तुळशीनाथकडे आली.

**– मा. डॉ. सुभाष भोर**
**घारगाव, आंबीखालसा**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# सहकारातील कृतीशील व एकनिष्ठ कार्यकर्ता कै. संभाजी यादव साबळे

## अखेरचा सलाम !

**जन्म - ०७/४/१९५२, मृत्यू - ०३/०९/२०२६**



**॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥**

दुनियेत येताना शरीर असते, नाव नसते; दुनियेतून जाताना शरीर नसते, पण नाव असते.
शरीराचे रूपांतर नावात करण्यासाठी जो प्रवास असतो, ते म्हणजे आयुष्य होय.

या ओळींचा अर्थ आपल्या कर्तृत्वातून जगून दाखविणारे सहकार, समाजसेवा, ग्रामविकास आणि धार्मिक कार्याशी आयुष्यभर एकनिष्ठ राहिलेले कै. संभाजी यादव साबळे (अंकल) यांचे ३ सप्टेंबर २०२६ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने खराडी गावाने एक ज्येष्ठ कार्यकर्ता, कुटुंबाचा आधार आणि माणसे जोडणारा आपुलकीचा व्यक्ती गमावला आहे.

कै. संभाजी साबळे यांचा जन्म ७ एप्रिल १९५२ रोजी शेतकरी कुटुंबात झाला. एम.ए.पर्यंत शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्यात अवजड मशिनरी विभाग प्रमुख म्हणून प्रदीर्घ सेवा केली. कामातील प्रामाणिकपणा व कुशलतेमुळे सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. पुढे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचे विश्वासू ज्येष्ठ कार्यकर्ते म्हणूनही त्यांचा लौकिक होता.

गावाशी त्यांची नाळ अखेरपर्यंत जोडलेली राहिली. प्रवरा नदीच्या पाण्याचा उपयोग करून जलसिंचनाच्या माध्यमातून स्वत:ची शेती बागायती करण्याबरोबरच इतर शेतकऱ्यांनाही त्यांनी प्रोत्साहन दिले. खराडी गावाच्या कृषी व आर्थिक विकासात त्यांचे योगदान मोलाचे ठरले. १९८४ मध्ये प्रवरा दूध उत्पादक सहकारी संस्थेच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. सुमारे तीन दशके चेअरमन म्हणून त्यांनी संस्थेचे नेतृत्व केले. त्यानंतर संस्थापक संचालक म्हणूनही ते कार्यरत राहिले. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्था नावारूपाला आली असून आज दररोज सुमारे १६०० लिटर दूध संकलन होत आहे. सभासद व दूध उत्पादकांचा त्यांच्यावर असलेला विश्वास त्यांच्या कार्याची मोठी पावती होती.

कुटुंबाची जबाबदारीही त्यांनी समर्थपणे सांभाळली. पत्नी हिराबाई, मुलगा विकास, मुलगी कल्पना, वंदना, नातवंडे तसेच मोठ्या एकत्रित कुटुंबातील सदस्यांना त्यांनी प्रेम आणि आधार दिला. पुतण्यांचे उच्च शिक्षण आणि कुटुंबातील विवाहकार्य त्यांनी जबाबदारीने पार पाडले.

धार्मिक कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग होता. २०१२ मध्ये भवानी माता मंदिर व मूर्तीची स्थापना, २०१७ मध्ये नवीन हनुमान मंदिराचे बांधकाम आणि २०२४ मध्ये दत्त मंदिराच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा त्यांच्या सहभागातून झाली. आदिवासी समाजाच्या येडूआई मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यातही त्यांनी योगदान दिले. गावच्या यात्रा व नवरात्रोत्सवाच्या आयोजनात जमा-खर्चाची जबाबदारी त्यांनी विश्वासाने पार पाडली.

अंकल यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे माणसे जोडण्याची कला आणि प्रत्येकाच्या सुख-दु:खात खंबीरपणे उभे राहण्याची वृत्ती. त्यांच्या मार्गदर्शनातून अनेक कार्यकर्ते घडले आणि त्यांच्या कार्यातून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळाली. आज ते आपल्यात नाहीत; मात्र त्यांनी उभ्या केलेल्या संस्था, केलेले सामाजिक व धार्मिक कार्य आणि दिलेले संस्कार यामधून त्यांचे स्मरण सदैव जिवंत राहील. अंकल, तुमच्या जीवनाचा प्रवास खऱ्या अर्थाने सार्थक झाला. तुम्ही दिलेले धडे आणि संस्कार पिढ्यान्पिढ्या मार्गदर्शक राहतील. आम्ही आपले सदैव ऋणी राहू.

तुम्ही दिलेले प्रेम, विश्वास आणि संस्कार यांची परतफेड कधीच होऊ शकणार नाही. तुमच्या आठवणी आमच्या मनात सदैव जिवंत राहतील. आपण अनंताच्या प्रवासाला निघून गेलात; पण आपल्या कार्याचा सुगंध आणि आठवणी आमच्यात कायम राहतील.

तुम्हाला हाच अखेरचा सलाम!

कै. संभाजी यादव साबळे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**साबळे परिवार, मौजे खराडी ग्रामस्थ**
**थोरात सहकारी साखर कारखान्यातील सर्व कर्मचारी**

# वडझरीमध्ये बिबट्याची दहशत आणि वीजेचा लपंडाव

## आठ दिवसांत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे महावितरणचे आश्वासन

युवावार्ता (प्रतिनिधी)

तळेगाव- संगमनेर तालुक्यातील वडझरी परिसरातील शेतीचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दिवसा वारंवार ट्रिपिंग, तर रात्री वीजेचा लपंडाव सुरू असल्याने शेतीला पाणी देणे अवघड झाले आहे. त्यातच परिसरात बिबट्याची दहशत असल्याने रात्री शेतात जाणे धोकादायक बनले आहे. अचानक वीज ये-जा होत असल्याने शेतीपंप व मोटारी जळण्याची भीतीही शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

या समस्येबाबत वडझरी परिसरातील शेतकऱ्यांची तळेगाव महावितरण कार्यालयातील सबस्टेशन येथे बैठक झाली. सहाय्यक अभियंता देशपांडे, वायरमन कर्मचारी तसेच पीएसआय भाबड व पोलिस कर्मचारी उपस्थित होते. शरद गोर्डे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. यावेळी सहाय्यक अभियंता देशपांडे यांनी येत्या आठ दिवसांत वीजपुरवठ्याची समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले. मात्र आठ दिवसांत वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास तळेगाव महावितरण सबस्टेशनसमोर तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा शरद गोर्डे यांनी दिला. यावेळी माजी सरपंच एकनाथ कांदळकर, ज्ञानेश्वर सुपेकर, दामू राऊत, पंडित वेताळ, गणेश बोडखे, अविनाश गायकवाड, विलास गोर्डे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.



# मुस्लिम समाजाच्या विविध प्रश्नांबाबत रऊफ शेख यांचे निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर -भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे अहिल्यानगर उत्तर जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांनी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांची भेट घेऊन मुस्लिम समाजाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व मूलभूत प्रश्नांबाबत निवेदन दिले. या प्रश्नांवर शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.



अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना अनुदानाच्या कक्षेत आणणे, पसमांदा मुस्लिम विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सुलभ व्यवस्था करणे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या कर्जवितरणात वाढ करून सरकारी जामीनदाराची अट शिथिल करणे, प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र अल्पसंख्यांक अधिकारी व आवश्यक कर्मचारी नियुक्त करणे, तसेच उर्दू शाळांमध्ये शिक्षकांची भरती करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली.

मदरसा आधुनिकीकरण योजनेची व्याप्ती वाढविण्यासह ग्रामीण भागातील कब्रस्तान व दर्गाह यांच्या अधिकृत नोंदी कराव्यात. ज्या गावांमध्ये कब्रस्तानासाठी जागा उपलब्ध नाही, तेथे शासकीय जागा द्यावी आणि नोंद असलेल्या कब्रस्तानांना संरक्षक भिंती उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली. वक्फशी संबंधित कामांसाठी नागरिकांना छत्रपती संभाजीनगर येथे वारंवार जावे लागू नये, यासाठी जिल्हास्तरावर सुविधा किंवा संपर्क केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली. तसेच समाजात तेढ व अशांतता निर्माण करणाऱ्या द्वेषपूर्ण किंवा चिथावणीखोर वक्तव्यांवर तक्रारीची वाट न पाहता कायद्यानुसार तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनाही निवेदन देण्यात आले. सलीम बागवान, अकिल इनामदार, मोहसीन सय्यद, शफीक बागवान, साहिल पटेल, अबुझर मोमीन, ताहीर मिस्तरी आदी उपस्थित होते.

रजि.नं. ए. एन. आर./ एस. एन. आर./ आर. एस. आर./ (सी. आर.) ७९०-९१-९२ रजि. ता. ३०/०८/१९९१

**संत ज्ञानेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. चिखली**

**आधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस (फक्त सभासदांसाठी)**

संत ज्ञानेश्वर ग्रामीण बिगर शेती सह. पतसंस्था मर्या; चिखली या संस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक - २०/०९/२०२६ रोजी सकाळी ९.०० वा. चिखली (संस्थेचे गोडाऊन) येथे संस्थेचे संस्थापक चेअरमन मा. श्री. भानुदास शंकरराव उपाध्ये यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार विनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढे येणारे विषय** दिनांक -०५/०९/२०२६

१) मा. नियोजित अध्यक्षसाहेब यांना अध्यक्षस्थान स्विकारणेची विनंती करणे.
२) दि. ७/९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
३) संचालक मंडळाने मंजुर केलेले सन २०२५-२०२६ सालचा ३५ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक, नफातोटा पत्रक इ. पत्रकांची नोंद घेऊन मंजुरी देणे.
४) संचालक मंडळाने सन २०२६-२०२७ सालचे मंजुर केलेले अंदाजपत्रक मंजुर करणे व मागील अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेले खर्चास मान्यता देणे व सन २०२५-२०२६ सालाचे केलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
५) संचालक मंडळाने मंजुर केलेला सन २०२५-२०२६ चे सरकारी ऑडीट रिपोर्टची नोंद घेऊन मंजुरी देणे. तसेच मागील दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेऊन मंजुरी देणे.
६) सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता अंतर्गत हिशोबतपासणीस व सरकारी ऑडीटरची नेमणुक करणे व लेखापरिक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे.
७) संस्थेचे संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडे कर्ज व थकबाकी बाबत विचार विनिमय करणे.
८) दोष दुरूस्ती समिती, कर्ज वसुली समिती, लेखापरीक्षण समिती अहवाला बाबत विचार विनिमय करणे.
९) दिलेल्या कर्ज व्याज रिबेटला मंजुरी देणे व पुढील काळात कर्ज व्याज रिबेट देण्यास संचालक मंडळास अधिकार देणे.
१०) प्रशिक्षण, कर्ज, गुंतवणुक, के. वाय. सी. पॉलिसी इ. विषयांबाबत वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
११) सुधारित आदर्श उपविधी स्विकारणे बाबत.
१२) कलम २४ अ खाली सभासदांना प्रशिक्षण देणे.
१३) सामोपचार परतफेड कर्ज योजनेतील लाभार्थी कर्जदारांची नोंद घेवून मंजुरी देणे.
१४) पोटनियम दुरूस्ती बाबत (पान. नं. ३० वर पहा)
१५) संस्थेच्या संगमनेर शाखेस जागा खरेदी करणे बाबत विचार विनिमय करणे.
१६) मा. अध्यक्षसाहेब यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार विनिमय करणे.

**मा. संचालक मंडळाच्या आदेशान्वये**
**बाळासाहेब रामभाऊ वलवे** (व्यवस्थापकीय संचालक)

**टिप :** १) सभेच्या वेळेस कोरम पूर्ण न झाल्यास त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून सभेच्या कामकाजास सुरूवात केली जाईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही. २) सभासदांना संस्थेच्या सन २०२५- २०२६ या काळातील कामकाजासंबंधी काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असल्यास त्याबाबत लेखी सुचना ३ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सुट्टीच्या दिवसाखेरीज पोहचतील अशा वेळेत पाठविणे अगर समक्ष आणून देणे. अशा प्रश्नांची उत्तरे व खुलासे मा. संचालक मंडळाकडून दिली जातील. ३) तेरीज पत्रक पत्रके संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आलेले आहेत. ४) आदर्श उपविधी संस्थेच्या नोटीस बोर्डावर कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

# पथ विक्रेता तक्रार निवारण समितीवर पगडाल, वालझाडे यांची सदस्यपदी निवड

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपरिषद क्षेत्रासाठी शासनाच्या पथ विक्रेता तक्रार निवारण व विवाद निर्णय समितीवर श्रीनिवास पगडाल व कृष्णा वालझाडे यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश अहिल्यानगर जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी पारित केले आहेत.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री नियमन) अधिनियम २०१४ आणि महाराष्ट्र पथ विक्रेता नियम २०१६ अन्वये राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणासाठी तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करण्याच्या सूचना शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्यानुसार संगमनेर नगरपरिषद क्षेत्रासाठी श्रीमती एस. बी. ढवळे, सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, संगमनेर यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीत श्रीनिवास पगडाल व कृष्णा वालझाडे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.





श्रीनिवास पगडाल हे संगमनेर नगरपरिषदेचे सेवानिवृत्त प्रशासन अधिकारी असून, लोकाभिमुख, शिस्तप्रिय व कार्यतत्पर अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. प्रशासकीय सेवेबरोबरच त्यांनी विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सामाजिक कार्यात योगदान दिले आहे. लायन्स क्लब, साथी भास्करराव दुर्वे नाना स्मारक प्रतिष्ठान, कॉ. दत्ता देशमुख प्रतिष्ठान, संगमनेर नगरपालिका कामगार संघटना, आधार फाउंडेशन, सह्याद्री आनंदयात्री तसेच राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून ते सामाजिक कार्यात सक्रिय आहेत.

कृष्णा वालझाडे हे सेवानिवृत्त नायब तहसीलदार असून, त्यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथेही सेवा बजावली आहे. तसेच माधवबाग आणि तिळवण तेली समाजाच्या माध्यमातून ते सामाजिक कार्यात सहभागी आहेत.

पथ विक्रेत्यांच्या तक्रारी, त्यांच्या हक्कांशी संबंधित प्रश्न तसेच विविध वादांचे निवारण करण्यासाठी ही समिती महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. श्रीनिवास पगडाल व कृष्णा वालझाडे यांच्या निवडीबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

**नोकरीची सुवर्णसंधी**
**'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'**
**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वत:ची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल

24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर





दैनिक **युवावार्ता**

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

परिवर्तनाचा पुरस्कर्ता













# कत्तलीसाठी डांबलेल्या १४ गोवंशीय जनावरांची सुटका



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील कुरण शिवारात कत्तलीच्या उद्देशाने बेकायदेशीरपणे डांबून ठेवलेल्या १४ लहान-मोठ्या गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने सुटका केली. या कारवाईत सुमारे एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, पाच संशयितांविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याच्या पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक संगमनेर शहर परिसरात गस्त घालत होते. यावेळी कुरण येथील जमील शेख याने शेतातील पत्र्याच्या शेडमध्ये व मोकळ्या जागेत गोवंशीय जनावरे डांबून ठेवल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी शेडमध्ये १४ गोवंशीय जनावरे बांधून ठेवल्याचे आढळले पोलिसांनी जनावरांची सुटका करून त्यांना ताब्यात घेतले.

या प्रकरणी जमील शेख, अशपाक शेख, तनवीर पठाण, आदिल शेख व सलमान शेख (सर्व रा. कुरण, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र पशुसंरक्षण कायदा तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांची चाहूल लागताच पाचही संशयित घटनास्थळावरून पसार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस संतोष मुटकुळे, विकास जाधव तसेच विजय पवार, रिचर्ड गायकवाड, राहुल डोके, भगवान थोरात यांच्या पथकाने केली.




# 'कृतार्थ मी' आत्मचरित्राचे शनिवारी प्रकाशन

## चंदन मसालेच्या नवीन वास्तूचा उद्घाटन सोहळा उत्सव

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

ज्येष्ठ उद्योजक केरुजी भिवाजी घुले यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'कृतार्थ मी' या आत्मचरित्राचे प्रकाशन तसेच जगदंबा फूड प्रोडक्ट्स (चंदन मसाले) यांच्या नव्याने विस्तारित वास्तूचा उद्घाटन समारंभ शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता खंदरमाळ, ता. संगमनेर येथे आयोजित करण्यात आला आहे.



'शब्दांतून जीवनाचा प्रवास... प्रेरणेचा सुवास...' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याच्या निमित्ताने अनेक दिवसांपासून भेट न झालेल्या आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि हितचिंतकांना एकत्र येण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

'चपराक' प्रकाशनाच्या माध्यमातून प्रकाशित झालेल्या 'कृतार्थ मी' या आत्मचरित्रातून केरुजी भिवाजी घुले यांच्या जीवनातील संघर्ष, अनुभव, जिद्द, उद्योगशीलता आणि यशाचा प्रवास वाचकांसमोर उलगडणार आहे. त्यांच्या जीवनप्रवासातून नव्या पिढीला प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हे आत्मचरित्र महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

याच सोहळ्यात ग्राहकांना दर्जेदार व उत्कृष्ट उत्पादने उपलब्ध करून देण्यासाठी विस्तारित करण्यात आलेल्या जगदंबा फूड प्रोडक्ट्स (चंदन मसाले) यांच्या नवीन वास्तूचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, ज्येष्ठ व्याख्याते एस. झेड. देशमुख आणि ज्येष्ठ उद्योजक गिरीशजी मालपाणी हे अनुक्रमे उद्घाटक, अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या आत्मचरित्र प्रकाशन व नवीन वास्तूच्या उद्घाटन सोहळ्याला सर्वांनी आपला घरचा कार्यक्रम समजून आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन चंदन मसाले परिवार व घुले परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.








दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25